

# माणूस

२२ डिसेंबर १९७३

पन्नास पैसे







## उफाळलेला सीमावाद

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

२२ डिसेंबर १९७३

# माणूस

वर्ष : तेरावे । अंक : तिसावा

## सप्रेम नमस्कार....

### ' युगांतर 'चा म. फुले विशेषांक

◻ ' माणूस 'च्या १ डिसेंबरच्या अंकातील वरील विषयावरील संपादकीय मजकूर वाचून सखेद आश्चर्य वाटले. तोल सोडून कडवट हिरीरीने लिहिण्याची आपली सर्वसामान्य प्रथा नाही. असे असताना हे संपादकीय आपण इतक्या संयमशून्यतेने कसे काय लिहिलेत ?

१. सबंध संपादकीय मजकुरात विशेष अंकातील कोणते विचार अथवा विश्लेषणातून काढण्यात आलेले कोणते निष्कर्ष आपणास पटले नाहीत व ते का पटले नाहीत याचा आपण उल्लेख केलेला नाही. ऐतिहासिक वस्तुनिष्ठ दृष्टी ठेवून, विभूती-पूजा टाळून, ज्या त्या काळातील वैचारिक अंत:प्रवाहांचे मूल्यमापन करून आपल्या विचारांची मांडणी करण्याचा प्रयत्न विशेषांकाच्या संपादकांनी केला आहे. ही विश्लेषण पद्धतीच जर आपणास मान्य नसेल तर त्यातील दोषस्थळे दाखवून आपण आपले मतभेद व्यक्त केले असते तर वाचकांच्या दृष्टीने ते अधिक योग्य झाले नसते का ?

२. फुले–आंबेडकरांची आठवण कम्युनिस्टांना आजच झाली हे आपले विधान वस्तुस्थितीस धरून नाही. या दोनही नेत्यांच्या वैचारिक उणीवांवर टीका करूनही त्यांच्या कार्याबद्दल कम्युनिस्टांनी या पूर्वी आदर व्यक्त केलेला आहे. या दोन नेत्यांच्या समग्र विचारसरणीचे व कार्याचे विश्लेषण कम्युनिस्टांनी यापूर्वी केलेले नाही. सत्यशोधक समाजाची शताब्दी नुकतीच महाराष्ट्रात साजरी करण्यात आल्यामुळे व त्या विषयाचा स्वत:चा पुरेसा अभ्यास झाल्यामुळे श्री. प्रभाकर वैद्य यांनी स्वत:च्या जबाबदारीवर हा विशेषांक या वेळेस म. फुले यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने काढला. (म.

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

फुले यांचे समग्र वाङ्मय १९६९ सालपर्यंत सहजासहजी उपलब्धही नव्हते हेही जाता जाता लक्षात ठेवले पाहिजे.)

३. कम्युनिस्ट चळवळ ज्या वेळेस उदयास आली व वाढली त्या काळात सत्यशोधक समाजाच्या आंदोलनाला सर्वत्र नाही तरी पुष्कळ ठिकाणी पुष्कळ बाबतीत अनिष्ट विकृत वळण लागले होते. या अनिष्ट प्रवृत्तीशी वेळ पडली त्यावेळेस कम्युनिस्टांनी झगडाही केलेला आहे. त्या काळात विवेचन करण्याच्या ऐवजी आज ते करता आल्यामुळे श्री. वैद्य यांच्या लिखाणात एकांगीपणा टळला आहे असे दिसते.

४. 'वरिष्ठ वर्ग-जातींच्या नेत्यावर टीका करतांना डांगे-निमकर यांचा विसर पडतो' हे आपले विधान त्या नेत्यांवर नेमकी कोणती टीका केलेली आहे हे लक्षात न घेतल्यामुळे केले गेले असावे असे दिसते. ज्या वरिष्ठ वर्ग-जातींच्या नेत्यांवर टीका आहे त्या नेत्यांनी वरिष्ठ वर्ग-जातींच्याच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक समस्या मुख्यत्वे करून हाताळल्या, श्रमजीवी कनिष्ठ जातींचे प्रश्न त्यांना उमगले नाहीत. साहजिकच कनिष्ठ वर्ग-जातीतील अनुयायी या नेत्यांना मिळाले नाहीत. डांगे-निमकर यांनी वरिष्ठ वर्ग-जातींचे वर्चस्व टिकविण्यात आपले आयुष्य घालविले की ते मोडण्याचा प्रयत्न करण्यात? आणि त्यांचा अनुयायी वर्ग कोण होता?

५. मुस्लिम सत्यशोधकांच्या चळवळीवरील लेखात आतापर्यंत काय व किती साध्य झाले आहे याचे विवरण करून इष्ट ध्येय साध्य करण्याकरिता, कोणती मात्रा उगाळली पाहिजे व कोणती पथ्ये पाळली पाहिजेत यावद्दल लेखकांनी आपले मत व्यक्त केले आहे. मांडण्यात आलेल्या मुद्यावर विवेकाधिष्ठित चर्चा अर्थातच होऊ शकते. पण संतापण्यासारखे काय आहे?

६. श्री. गणाचार्य वारले त्यावेळेस विशेषांक व पुरवणी जवळ जवळ तयार झाली होती हे उघड आहे. अशा वेळेस त्यांच्याबद्दलच्या मजकुरास कमी जागा दिली गेली हे सहज समजण्यासारखे सत्य आपणासारख्या संपादकीय अनुभव असणारांच्या नजरेतून कसे काय सुटले? श्री. गणाचार्य यांच्या मृत्युनंतर जे हजारो कामगार काम बंद ठेवून अंत्ययात्रेत सामील झाले ते कोणाचे अनुयायी होते? आपल्या नेत्याबद्दल आदर असल्याखेरीज ते एवढ्या मोठ्या संख्येने जमले होते काय?

७. आंतरराष्ट्रीय दृष्टी हे अख्ख्या मानव समाजाच्या प्रगतीचे अविरोधी घटक आहेत असे कम्युनिस्ट मानतात. तसेच सोविएत युनियन मानव समाजाच्या सर्वांगीण मुक्तिकार्यात बहुमोल भर घालीत आहे असे त्यांचे मत आहे. यामुळेच श्री. ब्रेझनेव्ह यांच्या भारतभेटीला विशेष महत्त्व आहे असे कम्युनिस्टांना वाटते व ते समजावून सांगण्याच्या दृष्टीने त्यांनी विशेषांकाला पुरवणी जोडली आहे. यात विसंगति अथवा राष्ट्रद्रोह काय आहे? विशेषांक निघण्याच्या सुमारासच ब्रेझनेव्ह यांनी

भारतास भेट दिली म्हणून विशेषांका-बरोबर पुरवणी काढण्यात आली. ब्रेझनेव्ह यांची भेट तर कम्युनिस्टांनी घडवून आणली नाही ना ?

काश्मीर प्रश्न निघाला त्या त्या वेळेस व गोव्याच्या प्रश्नाच्या वेळेला जागतिक राष्ट्र संघाच्या सिक्युरिटी कौन्सिलमध्ये व्हेटोचा वापर करणारा, साम्राज्यशाही व वसाहतवादाला विरोध करून लष्करी राष्ट्र गटांपासून अलिप्त राहण्याच्या भारताच्या जागतिक शांततेच्या धोरणाला पाठिंबा देणारा, व्यापार-व्यवहारात परदेशी चलनाची अट घालण्याऐवजी भारतीय चलनात म्हणजेच पर्यायाने वस्तुरूपाने दिलेल्या मालाची परतफेड स्वीकारणारा, देशाच्या विकासासाठी आवश्यक अशा जड उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी सर्व तांत्रिक सहाय्य पुरवून भारतीय तंत्रज्ञ शिकवून तयार करणारा, भारतातील दुष्काळाच्या वेळेस, वहातुकीसाठी अवास्तव खर्च न घेता तातडीने धान्य-पुरवठा करणारा, भारतीय शेतीचा विकास व्हावा यासाठी नमुनेदार सामुदायिक शेतीच्या उभारणीसाठी आवश्यक ते सर्व साहाय्य देणारा, भारतातील तेलाच्या खाणी शोधण्यासाठी मदत करून तेल काढण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारणारा आणि पाकिस्तानच्या युद्धाच्या वेळेस सर्व लष्करी पातळीवर आधुनिक सामुग्रीचा पुरवठा करणारा सोविएत रशिया भारताचा शत्रू आहे किंवा ते एक नगण्य राष्ट्र आहे असे जर आपणास वाटत असेल तर त्याचे सोदाहरण विवेचन आपण का करीत नाही ?

सारांश आपल्या रागाचे नेमके कारण काय आहे ('भिकार विशेषांक' असे आपण म्हटले आहे) ते समजत नाही. स्वा. वीर सावरकरांच्या विचार व कार्याच्या मर्यादा दाखविल्या आहेत व चातुर्वर्ण्याचे समर्थन करणाऱ्या गुरुजींवर टीका केली आहे हे तर कारण नव्हे ना ?

२–१२–७३ रा. प. नेने, पुणे

[ रागाचे नेमके कारण युगांतरचा दांभिकपणा. सत्यशोधक चळवळीविषयी अंकात दाखविला गेलेला कृत्रिम, उसना जिव्हाळा. यालाच 'वस्तुनिष्ठ विवेचन' वगैरे म्हणायचे असल्यास आपण तसे म्हणू शकता. वस्तुनिष्ठ विवेचनात अभिप्रेत असलेला किमान तोल मला त्या अंकात कुठेच आढळला नाही.

सावरकर-गुरुजी यांच्या कार्यासंबंधी युगांतरमध्ये आलेली टीका सुपरिचित असल्याने तिचा राग येण्याऐवजी कीवच अधिक करावीशी वाटते. —संपादक ]

# बँक लुटालूट सहकार स्टाईल

## निळू दामले

उस्मानाबाद जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदाच्या निवडणुकीत समुद्रे-नाडे गटाचा विजय झाल्यानंतर त्यांची विजयी मिरवणूक निघालेली आपण पाहिली. हा एवढा आनंद व उन्माद कशासाठी ?

नाडे हे गृहस्थ या बँकेचे अनेक वर्षांपासून संचालक आहेत. काही काळ चेअरमनही होते. परवाच्या मिरवणुकीत त्यांच्याबरोबर मिरवणारे नागरगोजे आदी लोकही संचालकपदावर कितीतरी वर्षे चिकटून आहेत. अशा या लोकांनी बँकेचा कारभार कसा चालवलाय याची कल्पना कोणाला आहे ?

उदाहरणार्थ ७१।७२ च्या बँकेच्या कारभाराचे अध्ययन आपण आता करू या.

ज्या संचालकांनी निवडून येण्यासाठी एवढा आटापिटा केला आणि विजयोन्मादाने पेट्रोलचा धूर केला त्यांनी, 'बँकेच्या कारभारावर १९७१।७२ च्या काळात योग्य ते नियंत्रण ठेवलेले नाही' या शब्दांतच लेखापरीक्षकाने (ऑडीटरने) आपल्या अहवालाला सुरुवात केली आहे,

आपल्या अहवालात लेखा परीक्षक म्हणतो, 'अहवालात नमूद केलेल्या दोषांची काटेकोर पूर्तता करण्याचे आश्वासन जरी संचालकांनी दिले असले तरी मागील वर्षाचा अनुभव लक्षात घेता केवळ या वर्षी संचालक मंडळ प्रगतीच्या दृष्टीने काही अद्भुत घडवून आणील यावर आमचा तरी विश्वास बसत नाही.'

या बँकेचा कारभार इतका छान चालला आहे की, 'अ' वर्गानंतर 'ब' वर्ग आणि ७१।७२ मध्ये 'क' वर्ग अशी प्रगती चालली आहे.

१९६९ मध्ये ३८०·५५ लाखावरून ७१।७२ मध्ये ३११·५५ लाखावर वैयक्तिक ठेवी घसरल्या आहेत. इतर ठेवींची कथा वेगळी नाही. अशा ठेवी जमवाव्यात असे संचालकांनी ठरवले होते पण संचालकांनी प्रत्यक्षात काहीच केले नाही.

ठेवीदारांच्या ठेवी परत देण्यासाठी बँकेने महाराष्ट्र राज्य सहकारी बँक आणि स्टेट बँकेकडून ओव्हरड्राफ्ट घेतला. ठेवी परत करण्याबरोबरच मध्यम मुदतीचे कर्ज वाटप करण्यासाठी ह्या ओव्हड्राफ्टची रक्कम वापरण्यात आली. म्हणजेच जास्त व्याजाने घेतलेला पैसा कमी व्याजात वापरावा लागला. वा रे तुकारामाचे अवतार !

### कर्जाचे वाटप : अजब कारभार !

कर्जाचे वाटप करताना खूपच धमाल करण्यात आली आहे. ज्या ठिकाणी

वीज नाही, विहीर नाही अशा गावात मोटरीसाठी कर्ज मंजूर करण्यात आले आहे. (आता हे कर्ज लग्न, निवडणुका किंवा तत्सम कारणासाठी वापरले गेले असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. चालायचेच निवडून येण्यासाठी हे सर्व करावेच लागते. नाहीतरी पैसा जनतेचाच असतो, जनतेकडे गेला तर त्यात काय बिघडले ?)

कर्ज विषयक धोरणाबाबत लेखा परीक्षकाला म्हणावे लागले की 'कर्ज-विषयक धोरणाची कोणतीही अट उल्लंघण्याची बाकी ठेवली नाही. कर्ज विषयक धोरणाच्या जास्तीत जास्त अटी कशा उल्लंघता येतील याची जणू स्पर्धाच होती असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.'

संस्थेचे अध्यक्ष व इतर सभासदांना हातावर शिलका असताना कर्ज मंजूर करण्यात आली. थकबाकीदारांना सर्रास कर्ज वाटप करण्यात आले. निवडणुका व अन्य वेळी बँकेचे कर्ज वाटणे हा हमखास लागू पडणारा उपाय असतो. त्यासाठी मग मार्च ते सप्टेंबर या काळातच कर्ज वाटप झाले पाहिजे हा नियम धाब्यावर बसवण्यात आल्याचे पहायला मिळते. कित्येक ठिकाणी तर लोन बाँड्स लिहून न घेता किंवा सह्या न घेताही कर्जाचे वाटप झाले आहे. १८ पेक्षा वयाने लहान असणाऱ्यांना कर्जाचे वाटप झाले आहे. ऐपत नसतानाही कोणत्याही सोम्या गोम्याला कर्ज मंजूर करण्यात आले, की जे परिणामतः बुडित खात्यात जमा होऊन बँक नुकसानीत निघाली. बागायतदार कंपनी यांची फार लाडकी. कारण उसाच्या आणि द्राक्षाच्या पैशावर ही मंडळी टरटर करणार ना ! म्हणूनच बागायतदारांवरची कर्जे रूपांतरित करण्यात आली. साखर नसेल तर हे लोक कसे जगणार ? या बँकांना साखर कारखानदार (स्वाहाकारी) जास्त जवळचे. त्यांच्यासाठी हे लोक काहीही करायला तयार. (सामान्य शेतकरी गेला तरी चालेल) म्हणूनच तेरणा नगर (सहकारी साखर कारखान्याच्या क्षेत्रातील सभासदांना त्यांचे कर्ज परत फेडता येईल येवढे कर्ज मंजूर केले गेले ! ट्रॅक्टरसाठीही अटी न पाळता कर्ज वाटप झाले. आवश्यक कागदपत्रे पाहिली गेली नाहीत, खाडाखोडीही करायला मागेपुढे पहाण्यात आले नाही. जमीन नसलेल्यांनाही शेती कर्ज मंजूर करण्यात आले. बऱ्याच पुढारी लोकांना थकबाकी असूनही कर्ज मंजूर करण्यात आले.

ऑईल इंडस्ट्रीज लातूर ही एक अनंत भानगडींनी भरलेली इंडस्ट्री, बँकेची फार लाडकी, या उद्योगाला क्लिन कॅश क्रेडिट ५ लाखाच्या अगेन्स्ट सतत २५ लाख रुपये देण्यात आले. ज्यापैकी १८ लाख रुपये अजूनही थकलेले आहेत. हे २० लाख रुपयाचे जादा कर्ज नियमाविरूद्ध होते. पण त्याहीपुढे जाऊन नंतर त्या कर्जाचे पुढे ७ वर्षाच्या मध्यम मुदतीच्या कर्जात रूपांतर करण्यात आले. लेखा परीक्षेच्या वेळी ह्यापैकीही एक हप्ता बाकी होता

**पृष्ठ ४६ वर**

# सोलकढी

## प्रेषित वसंतराव नाईक

माननीय वसंतराव नाईक हे भूमंडळीच्या थोर्थोर नेत्यांपैकी एक आहेत ही गोष्ट अनेकांनी सप्रमाण सिद्ध केली आहे. दोन महिन्यांमागे, साठ वर्षे पुरी झाली म्हणून, वसंतरावांचे चरित्र-चित्रण करणारे अनेकानेक लेख प्रसिद्ध झालेले महाराष्ट्रीय वाचकांनी रोमांचित होत वाचले आहेत. आम्ही देखील, २५ ऑगस्ट १९७३ रोजीच्या 'माणूस'-मध्ये, 'सोलकढी 'तून, 'थोर्थोर वसंतराव नाईक' या शीर्षकाचे एक स्फूर्तिदायक स्फुट लिहून महाराष्ट्राच्या या अलौकिक मुख्यमंत्र्याबद्दलचा परमादर व्यक्त केला होता. पण त्याने आमचे समाधान झाले नव्हते. अहो, महाकाव्याचा नायक होण्याची ज्याची योग्यता त्याचे वर्णन एका चरणात आटोपण्याचा खुळेपणा होता तो. म्हणूनच आता ५ डिसेंबर १९७३ रोजी वसतरावांच्या मुख्यमंत्रिपदाच्या अलांछित कारकीर्दीला पुरी दहा वर्षे झाली हे पाहून पुन्हा त्यांच्या थोर्थोरवीचे थोडे स्मरण करावे म्हणतो.

तिकडे राज्योराज्यी डझनांनी मुख्यमंत्री कोसळताहेत; इकडे वसंतराव नाईक मुख्यमंत्रिपदाची दहा वर्षे संपवून पुढील नव्वद वर्षांच्या कारकीर्दीचा आराखडा तयार करीत आहेत. प्रतिपश्चंद्ररेखेव विकास करणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या अतुलनीय विकासाचे सारे श्रेय, माझ्या मते, मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि त्यांचे नेतृत्त्व यांनाच द्यावे लागेल. गेल्या दहा वर्षात या एका राज्यावर किती संकटे यावी ? पण ही संकटे आली ती वसंतराव नाईक कोणत्याही संकटावर मात करतात हे सिद्ध करण्यासाठीच. थोडे तपशीलात जाऊन असे म्हणता येईल की महाराष्ट्रात दुष्काळ पडले ते वसंतराव नाईक त्यातून किती झटपट सुकाळ उभा करतात हे दाखवण्यासाठी; महागाई झाली ती नाईक ती कशी हुकमी रोखतात ते लक्षात येण्यासाठी; काळाबाजार वाढला तो नाईकशासन त्याला परिणामकारक पायबंद कसे घालतो ते जगाला दिसावे यासाठी.

हे मुख्यमंत्री वसंतराव नाईकांनी कसे साधले, याची फारशी कुणालाच माहिती नव्हती. परंतु नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकीत पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सिद्धार्थशंकर रे यांनी नाईक तंत्राचे इंगित सर्वांना सांगितले. वसंतराव नाईकांपुढे सिद्धार्थशंकर रे म्हणजे सह्यगिरीपुढे मातीचे ढेकूळ. त्यामुळे सिद्धार्थशंकर रे यांच्यापुढे जेव्हा एक समस्या उभी राहिली तेव्हा त्यांनी वसंतराव नाईकांना सल्ला विचारला.

नाईकांनी, बंदुकीचा चाप ओढावा तसा, खाडकन सल्ला दिला : 'काऽही करू नका; समस्या आपसूक सुटून जाईल !'

मानवी व्यवहाराबद्दलचा असा क्रांतिकारक सिद्धांत मांडणारा प्रेषित या आपल्या महाराष्ट्रात जन्माला यावा, इतकेच नव्हे तर तो या आपल्या महाराष्ट्राचा गेली दहा वर्षे (आणि पुढील नव्वद वर्षे) मुख्यमंत्री असावा, हे पाहिले म्हणजे परमेश्वर आमचा कैवारी आहे, अशी मनाची खात्री पटते. ◻

## अस्मितेला धार लावणे

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा-प्रश्न हा आपल्या राष्ट्रापुढला आजचा सगळ्यात महत्त्वाचा आणि ज्वलंत प्रश्न आहे, याबद्दल महाराष्ट्रात आणि कर्नाटकात तरी दुमत होणार नाही. पाचवी योजना, देशात सर्वत्र आढळणारे अस्थैर्य, परिस्थितीने आक्रसत जाणारे चारित्र्य, या गोष्टी सीमाप्रश्नाच्या तुलनेने अगदीच मामुली आहेत. त्यांचा फारसा विचार करण्याचे कारण मला दिसत नाही. सीमाप्रश्नाचे मात्र तसे नाही. तो महाराष्ट्राला हवा तसा सुटला किंवा कर्नाटकाला हवा तसा सुटला, किंवा दोघांना हवा तसा किंवा नको तसा सुटला, किंवा कधी सुटलाच नाही तरी त्यासाठी आता चुळकाभर रक्त आटवायचे प्रत्येक महाराष्ट्रीयाने आणि कर्नाटक्याने पक्के ठरवलेले दिसते.

त्यासाठी महाराष्ट्रात आणि कर्नाटकात आपापल्या अस्मितेला धार लावण्याचे कार्यक्रम गेली कित्येक वर्षे जारी आहेत. येथलीच कपाळकरंटी माणसे कधी कधी महाराष्ट्राच्या महापुरुषांवर वेडीवाकडी चिखलफेक करतात तेव्हा त्यांचे हात कलम करण्याचा इशारा त्यांना द्यावाच लागतो : त्या पंढरीनाथ रानडचाला आम्ही विद्यापीठातून काढून टाकला; झोपाळू नाना फडणिसाचे चित्रण करणारे 'घाशीराम कोतवाल' नाटक बंद करून टाकले; विकृत वाङ्मयेतिहास देणाऱ्या 'महाराष्ट्र-सारस्वत' ग्रंथाला अभ्यासक्रमाबाहेर फेकून दिले. यामुळे महाराष्ट्राची अस्मिता कशी लखलखीत राहिली आहे...परवा कर्नाटकातसुद्धा त्यांच्या अस्मितेला धार लावण्याचा एक कार्यक्रम विधीपूर्वक पार पाडण्यात आला. बसवलिंगप्पा नावाचे एक मंत्री देवराज अरस-मंत्रीमंडळात होते. एका व्याख्यानात, त्यांनी सगळे कानडी साहित्य हे कडब्यासारखे फोलकट आहे, असे उद्गार काढले. (मला कानडी येत नाही; पण सीमाप्रश्नाबद्दल पोटतिडिक असलेला मराठी माणूस म्हणून बसवलिंगप्पांच्या मताशी मी पूर्ण सहमत आहे.) कर्नाटकात, महाराष्ट्रासारखे, महापुरुष नसावेत; नाहीतर बसवलिंगप्पांना त्या महापुरुषांबद्दल अनुदार उद्गार काढता आले नसते. ती उणीव त्यांनी कानडी साहित्याला 'कडबा' म्हणून भरून काढली. या त्यांच्या चलाखीचे आम्हाला कौतुक वाटते. बसवलिंगप्पांच्या उद्गारांचे खरे

पृष्ठ ४८ वर

विधानसभेतील प्रश्नोत्तरांवर आधारित

# अजब तुझे सरकार !

सु. ल. सोमण

## मिलो साफ केला नाही मंत्री काय करणार ?

प्रश्न क्रमांक १४३४२ : दिनांक २४ ऑगस्ट, १९७३

प्रश्न : आ. श्री. बा. गो. पाटील, तासगाव

सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१. तासगाव, जिल्हा सांगली, येथील धान्य गोडाऊनमधून मे, १९७३ च्या शेवटच्या आठवड्यात व जून, १९७३ च्या पहिल्या आठवड्यात जो मिलो वाटप केला तो अत्यंत किडका व साफ न केलेला होता हे खरे आहे काय ?

२. गोडाऊनकीपर यांच्याकडे मिलो साफ करण्याची मागणी केली असता, साफ करून देण्याचे नाकारले गेले होते हे खरे काय ?

३. असल्यास, मिलो साफ न करून देण्याची कारणे काय ?

**उत्तर : अन्न व पुरवठा मंत्री श्री. भाऊसाहेब वर्तक**

१. वाटप केलेला मिलो किडका नव्हता. तथापी तो नेहमीच्या पद्धतीने साफ केलेला नव्हता.

२. हे खरी नाही.

३. अन्न महामंडळाने असे कळविले होते की एस. एस. लेटो या जहाजातून आलेला मिलो धत्तुरा बी विरहित असून तो साफ न करता वा हाताने न निवडता स्वस्त धान्य दुकानांना वाटप करण्यासाठी देता येईल. सबब तो साफ न करता स्वस्त धान्य दुकानांना देण्यात आला.

–मिलो नाहीतरी साफ करायचा नसतोच ! त्यातून अन्नमहामंडळाच्या सूचना ! ! मग साफ करायचाच कशाला उग्गीचच्या उग्गीच ? (आता त्यावेळी आ. श्रीमती मृणाल गोरे विरुद्ध ना. भाऊसाहेब वर्तक ह्यांच्यातला 'धत्तुरा वाद' चालू असतानाही मिलो साफ केला गेला नाही असा आगलावेपणाही फुक्कट कुणी करतीलही !

–ऑक्टोबर, १९७३ मध्ये पूर्वसूचना देऊनही नोव्हेंबर–डिसेंबरमध्ये 'अरगॉट' बाजरी साफ न करता बाजारात आली, शेकडोंना विषबाधा झाली. जितूरला दोघांवर मृत्यू ओढवला !

तेव्हा मिलो साफ नाही केला,

बाजरी साफ नाही केली, गहू साफ नाही केला, तर मंत्री तरी त्याला काय करणार? कुठे कुठे बघणार मंत्री तरी ??

## प्राथमिक आरोग्य केंद्र, नव्हे पथक इमारतीचं बांधकाम नंतरचा प्रश्न!

प्रश्न क्रमांक १६४१५ : दिनांक २९ ऑगस्ट, १९७३

प्रश्न : आमदार श्री. श्री. रा. तांबे, जुन्नर

सन्माननीय आरोग्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.

१. हवेली तालुक्यातील मोशी येथील प्रथमिक आरोग्य केंद्राची इमारत धोक्याची झाली आहे इतकेच नव्हे तर इमारतीचा काही भाग पडला आहे, हे खरे आहे काय?

२. असल्यास, त्यावाबत काय कारवाई करण्यात आली आहे किंवा येत आहे?

**उत्तर : आरोग्य मंत्री डॉ. रफिक झकेरिया**

१. होय. पण मोशी येथे प्राथमिक आरोग्य पथक आहे, प्राथमिक आरोग्य केंद्र नाही.

२. या दवाखान्याची एक खोली दुरुस्त करून तिच्यात दवाखान्याचे साहित्य व औषधे ठेवण्यात आली आहेत. तसेच इमारतीचा काही पडलेला भाग दुरुस्त करण्यासाठी जिल्हा परिषदेने अंदाजपत्रक तयार केले होते, परंतु तपासणी केली असता असे आढळून आले की ही इमारत दुरुस्त करून काही उपयोग होणार नाही. त्या ठिकाणी नवीन इमारत बांधणे योग्य ठरेल. त्यानुसार अंदाजपत्रक तयार करण्याचे काम चालू आहे.

मोशीला प्राथमिक आरोग्य केंद्र नाही, पथक आहे, एवढी साधी गोष्ट देखील, आमदार महाशयांना माहीत असू नये नं? दुरुस्ती काय करायची आहेच, पण ह्या मूलभूत प्रश्नावर गैरसमज रहायला नकोत!

एक अंदाजपत्रक रद्दबातल ठरून दुसरं बनवण्याचं काम चालू आहे. हे पूर्ण होऊन पुन: रद्दबातल ठरायची वेळ येणार नाही. कारण तोपर्यंत बहुधा दवाखान्याची (नक्की ना? की पथकाची जागा?) जागा पडलेली असेल असा विश्वास आहे!!

● ● ●


# पूर्णिया

अनिल अवचट

सहा रुपये

राजहंस प्रकाशन

# मुक्ताफळे

## ☐ राजा आणि इसाप

साटेलोटे नगर होते. तिथे एक राजा होता.

दुपारची वामकुक्षी आटपून राजा पुनः झोपण्याच्या तयारीत होता तोच हुजऱ्याने वर्दी दिली...' मंत्री भेटायला आले आहेत...'

जांभई देत राजा म्हणाला—' येऊ द्या. साले नेमके आमच्या झोपायच्या वेळी येतात...'

' काय काढलंय आज ?' राजाने जरा दरडावून विचारले.

' महाराज राज्यात लाचलुचपत फार वाढली आहे. काळा पैसा कॅनॉलसारखा वहातो आहे...'

राजाला कळेना मंत्र्याच्या हे आताच कसे एकदम लक्षात आले ! त्याने विचारले—' तुम्हाला हे कधी कळले ?'

' काल रात्री ?'

' रात्री !'

' आम्ही गुप्त वेषाने रात्री बाहेर पडलो. चंपाबाईकडे गेलो—'

' तिच्याकडे जायला गुप्त वेष कशाला ? ते तर तुमचेच गिऱ्हाईक आहे ! लाजू नका. पुढं बोला...

' तिथं चंपाच्या पलंगावर आपल्या पब्लीक वर्क्स खात्याचा अधिकारी सापडला. हरामखोर पैसे खातो आणि बायांवर उधळतो. त्याच्या संपत्तीची महाराज चौकशी करावी !'

महाराजांच्या लक्षात आले. मंत्र्याच्या नाजूक भानगडीवर सरकारी अधिकाऱ्याने डल्ला मारला म्हणून हा पिसाळला आहे. राजा म्हणाला—

' असं म्हणता !'

' तर हो ! त्याच्या भानगडीची फाईल सचिवालयात तयार आहे. महाराज. हुकूम होईल तर सगळ्या संपत्तीचा झाडा घेऊ...'

' घ्या...घ्या. त्यांचा झाडा घ्या. त्याच्या हाताखाली काम करणाऱ्यांचो पण यादी करा. वरचा खातो हे कळले की खालचे पण दाबून खातात. सगळ्यांच्या संपत्तीचा झाडा घ्या. पळा आणि हे बघा त्या सांस्कृतिक खात्याच्या मंत्र्याला लावून द्या '

थोड्या वेळाने सांस्कृतिक खात्याचा मंत्री आला. महाराजानो विचारले—

' काय म्हणत्येय राज्याच्या संस्कृती ?'

' पातळी सारखी उंचावत्येय महाराज !'

' असं ! ती कशी काय बुवा ?'

' महात्मा गांधीची जयंती आता बाहेर कुणी करीत नाही ! सगळ्या तुरुंगात करत्यात...'

' छान आहे...तिथे भाषण कोण करतं ?'

'विसापूरच्या तुरुंगात परवा झाली बघा गांधीजयंती, तिथे बाजीराव कोते पाटील बोलले. महात्मा गांधीच्या आदर्श जीवनावर फार छान बोलले. म्हणाले—'या कारागृहात आलो हे मी आपले भाग्य समजतो.'

'असं म्हणाले! कशामुळे हे भाग्य लाभलं त्याना—?'

'त्याचं काय झालं......बाबांच्या दक्षिणेच्या रकमेतले त्यानी पैसे मारले आणि संस्थानच्या निवडणुकीत मतपत्रिकांच्या त्यानी पेटचा बदलल्या..'

'नैतिक शिक्षण कोण करतं राज्यात..'

'फार माणसं या कामाला आहेत महाराज. आमचं स्वतंत्र आहे. शिवाय गावोगाव अध्यात्मी महाराज आहेत. आचार्य आहेत. भगवान आहेत. शिवाजी महाराजांचे पुतळे खेडोपाडी बसवले आहेत. सामाजिक अन्यायाविरूद्ध परिषदा भरतात. साहित्यिक बाया माणसे भाषणं करतात. काही मंत्री जातीने साहित्य संमेलनाला उपस्थित रहातात. सामान्य माणूस निर्भय होईल असे वातावरण तयार करण्याची गरज आहे हे सगळयांना पटत चाललेलं आहे. धर्मातीत लोकशाही—भारतीयत्वाची श्रेष्ठता—'

'गप बसा हो! एकावेळी किती बोलता. तुम्ही म्हणता पातळी वर जाते आहे. बघा तो दुसरा मंत्री आला तो बोवलत होता—पातळी खाली जाते आहे. आम्हाला काही कळत नाहीसं झालंय. जा तुम्ही. कायदा मंत्र्याला लावून द्या—'

कायदा मंत्री एक डोळयाने आंधळा होता. तो येताच राजाने विचारले—'तुम्हाला कुणी कायदा मंत्री केले?'

'आपणच महाराज. मुख्य मंत्र्यानी शिफारस केली नाही का—कायदा आंधळा असतो. त्याचा एक डोळा बंद असला तरी दुसरा उघडा हवा—'

'उघडया डोळयाने तुम्हाला काय काय दिसतं?'

'फार दिसतं महाराज. पण काही करता येत नाही. आपल्या हाऊसिंग बोर्डाच्या नारायणराव कोळसे पाटलानी फार पैसे खाल्ले म्हणतात! विधान-सभेत फार आरडाओरडा झाला. पण पुरेसा पुरावा कुठं आहे महाराज. पुराव्याशिवाय काही करता येत नाही. आम्ही काही करणार नाही. पुरावा सांपडला की धाडतोच सगळयांना खडी फोडायला. तो ×××नगरचा इंजिनिअर त्याचा असिस्टंट—गेली की दोन दोन वर्षे. पुराव्याशिवाय काही नाही बघा महाराज..'

त्याचवेळी इसाप राजाला भेटायला आला. कायदा मंत्री निघून जाताच इसापाला महाराजानी बोलावले.

'इसापा तू फार शहाणा माणूस समजला जातोस. माझ्या राज्यात गुन्हेगार आहेत. पण पुराव्यावाचून सुटतात. खटले भरता येत नाहीत अशी स्थिती आहे.'

इसाप क्षणभर विचारात पडला. थोडयावेळाने म्हणाला—

'तुमच्या राज्यात जिकडे तिकडे महात्मा गांधीचे पुतळे आहेत ते पाहिले. या माणसाने तुम्हाला सत्याग्रह शिकवला आहेना?'

'सत्यापेक्षा पुरावा श्रेष्ठ असतो कायद्यात...!'

'असू द्या. सत्याग्रह करणारे हजार तरुण निवडा. राज्यात जो जो कुणी पैसा खातो त्याची माहिती लपून रहात नाही. त्यांच्या याद्या करा आणि एका एका तरुणाला एकेकाचे नाव घेऊन जाहीर सभातून आरोप करायला सांगा...'

'पुराव्याचे काय?'

'पैसे खाणारी माणसे अब्रूनुकसानीचे खटले करायला सहजी धजावणार नाहीत. धजावलीच--पुरावा कमी पडला तर सत्याग्रह्यानी तुरुंगात सांगावे--'पुराव्या अभावी हा माणूस कायद्याने' सुटत असला तरी हा माणूस पैसे खातो हे सत्य आहे आणि हे सांगण्याची शिक्षा म्हणून मी तुरुंगात जायला तयार आहे...'

इसापाचे राजाने आभार मानले. त्याने सगळे मंत्रीमंडळ बरखास्त केले आणि तरुणांना आवाहन केले. राजवाड्यात जमा.

ठरलेल्या दिवशी राजवाड्यावर तरुणांचे मोर्चे येऊ लागले. राजा आनंदित झाला. तो उत्साहाने प्रासादाच्या सज्जात आला. हाकललेल्या मंत्र्यानी दावा साधला होता. सगळ्यांच्या हातात फलक होते--

'लोकशाहीचा विजय असो' 'राजेशाही मुर्दाबाद' 'निवडणुका झाल्याच पाहिजेत' 'गोवा--बेळगाव--कारवार--धारवाड--निपाणी सह...'

--ग्यानबा

# कोल्हापूर रविवार दि. ९

रविवार दि. ९--आठवड्याच्या बाजाराचा दिवस, शहरात सकाळपासूनच नित्याच्या व्यवहाराला प्रारंभ झाला होता. सर्वत्र शांतता होती. बाजारचा दिवस असल्याने आसपासच्या खेड्यातील लोक बाजारला आले होते, आणि ९ च्या सुमारास शहरात वार्ता पसरली सौंदत्ती येथे यल्लमाच्या यात्रेस गेलेल्या मराठी यात्रेकरूंना कन्नड पोलिसांनी मारहाण केली. गुंडगिरी केली. आणि अचानक वातावरण तप्त झाले. कोठूनतरी ५००--६०० चा जमाव लक्ष्मीपुरीत आला आणि 'हॉटेल द्वारका' या उडूपी हॉटेलावर त्याने हल्ला चढवला. लुटालुटीस सुरुवात झाली. बाजार उधळला आणि वातावरणाला हिंसक वळण लागून शहरातील सर्व दुकाने अर्ध्या तासात बंद झाली. थोड्याच वेळात लुटालुटीचे, जाळपोळीचे हे सत्र राजारामपुरी, शाहूपुरी, महाद्वार रस्ता या भागात पसरले. आणि उडप्यांच्या हॉटेलावर हजारोंच्या जमावाने लुटालुटीला, जाळपोळीला सुरुवात केली. अकरा वाजता शहरातील सर्व उडपी हॉटेलांची लूट होऊन जाळ-

पोळ सुरू झाली होती. पोलीस आधीच अपुरे होते आणि त्यांनी हस्तक्षेप केला तर जमावाकडून तुफानी दगडफेक होत होती.

शहरातील सर्व भागात, ६० हजारांचा जमाव गटागटांनी जाळपोळ करीत हिंडू लागला. एस्. टी. स्टँडसमोरील हॉटेल सह्याद्री या पाच मजली इमारतीला जमावाने आग लावली तर स्टेशनसमोरील 'गोकुळ'मध्ये गॅससिलिंडर फोडून तो पेटविण्यात आला. राजारामपुरीतील हॉटेल मथुरा, महाद्वार रस्त्यावरील कामत, सन्मान, व्हिनस टॉकीजजवळचे प्रभात, बिंदू चौकातील वेस्टर्न, या मोठ्या उडपी हॉटेलबरोबरच शहरातील सर्व लहानमोठ्या ४५ उडपी हॉटेलांची लूट करून नंतर त्यातील फर्निचर बाहेर आणून जाळले. दुपारी दोनपर्यंत हा बेबंद जमाव आगी लावीत हिंडत होता. आराम कॉर्नर, व्हीनस कॉर्नर येथे असणारी वेश्यांची घरेही जमावाने पेटवून दिली. आणि त्यांना हाकलून लावले, तर या सीमाप्रश्नाशी ज्यांचा काहीही संबंध नाही अशा कदमवाडी येथील १००, सदरबाझारातील ५०, व कळबा नाल्यानजिकच्या ५० अशा २०० झोपडपट्टीवासीयांच्या झोपड्याही पेटवून दिल्या.

पोलिसांचे हातून परिस्थिती आधीच गेली होती. दुपारी ३ वाजेपर्यंत शहराच्या सर्व भागात आगीचे लोळ दिसत होते तर धुराचे लोट १० मैलावरून दिसत होते. दुपारी १२ वाजता १४४ कलम जारी केले. ३ वाजता जिल्हादंडाधिकाऱ्यांनी १८ तासांची संचारबंदी जारी केली पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. उलट चार वाजता लक्ष्मीपुरी या मुख्य पोलीस स्टेशनमध्ये जिल्हाधिकारी बसले असता तेथून ५० पावलावरील हॉटेल विसावा व १० पावलावरील 'बंगाली हॉटेल' जमावाने फोडून लुटले व त्यातील फर्निचर बाहेर आणून पेटवले. नंतर हा जमाव सरळ लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशनवर चालून आला व स्टेशनवर त्याने तुफानी दगडफेक केली. तेव्हा पोलिसांनी प्रथमच अश्रूधुराचा वापर केला व स्वतःचा बचाव केला.

दुपारी चारनंतर पुनः परिस्थिती बिघडली. पोलिसांची कोणतीच दहशत नसल्याने व कोणत्याही ठिकाणी पोलिसांनी हस्तक्षेपन केल्याने जमावाचे लक्ष्य दाक्षिणात्य हे न राहाता सरळ गुंडगिरी सुरू झाली. हलसगेकर, सुजाता, सीमा-वाईन शॉप ही तीन परदेशी दारूची दुकाने फोडून दारू प्राशनाचा कार्यक्रम राजरोसपणे सुरू झाला. रात्री ७ वाजता शिवाजी मार्गावर भरवस्तीत असणाऱ्या 'भारत वॉच कंपनी' या रेडिओ व घड्याळांचे दुकान जमावाने फोडून त्याची लूट केली व त्याला आग लावली. यावेळी दुकानाचे मालक श्री. शहा तासभर, जिल्हाधिकाऱ्यांना दुकान लुटले जात आहे, पोलीस पाठवा असे सांगत होते पण तेथे पोलिस गेलेच नाहीत. थोड्याच वेळात, म्हणजे रात्री ८ वाजता १५० फूट लांब व तीन मजली अशी ही इमारत अग्निज्वाळांनी पूर्ण वेढली

तरीही पोलीस गले नाहीत. या चाळीतील २५ कुटुंबे जमावानेच वाचवली. ही भीषण आग रात्री १२ वाजेपर्यंत होती. रात्री ३ वाजता 'अग्निशामक' दलास पोलिसांनी संरक्षण दिल्यावर आग विझवण्यास सुरुवात झाली. भारत वॉच कंपनीगरोबरच 'गरगटे भांडी दुकान', 'हिंद इलेक्ट्रॉनिक्स' व २५ कुटूंबाचा आसरा या आगीत भस्मसात झाला होता.

रात्री आठ वाजता पोलिसांच्या गाड्या संचारबंदी जारी केल्याचे लाऊड स्पीकरवरून जाहीर करीत हिंडत होत्या. तर शहरातील स्त्रिया व मुले संचारबंदीत गणेशोत्सव पाहावयास जावे तशी घोळक्या घोळक्यांनी, आगीचे दृश्य पहात हिंडत होती.

रात्री दहानंतर एस्. आर. पी. ची जादा कुमक आल्यावर परिस्थिती आटोक्यात आल्याचे सांगण्यात आले. तोवर झालेल्या हानीचा तपशील असा होता– १५ हॉटेलांची पूर्ण लूट–जाळपोळ, ३० हॉटेले-दुकाने लुटली, शेकडो वाहने पेटवली, २०० झोपडपट्ट्या जाळल्या, ३ हजार नागरिक बेघर झाले! २ कोटींचे नुकसान झाले असावे.

या सर्व दंगलीत, पूर्ण दिवस व रात्र नागरिकांनीं भितीग्रस्त अवस्थेतच काढली. शहरात 'शासन' नावाची काही यंत्रणाच अस्तित्वात नव्हती. सारे दंगलखोरांचेच साम्राज्य होते. शहरातील साऱ्या रस्त्यावर, जळक्या फर्निचरचे ढीग, राखेचे ढीग दिसत होते. णालेली जाळपोळ पाहून शरमेने मान खाली जात होती. दिवसभर झालेल्या गुंडगिरीच्या व जाळपोळीच्या प्रकारात एकही हॉटेल अथवा दुकान वाचविण्याचा पोलिसांनी अथवा शासन यंत्रणेने प्रयत्न केला नाही. लोक रडून सांगत होते, अहो आमचे दुकान लुटले जातंय, पेटवले जातंय, पोलीस मदत द्या. पण एकदाही मदत मिळाली नाही. पोलिसांनी फक्त बघ्याची भूमिका घेतली होती. संपूर्ण दिवसात एकाचेही वित्त सुरक्षित नव्हते.

दंगलीचा सारा तपशील द्यायचा तर एक मोठा अहवालच होईल. कोल्हापूरात पोलीस बंदोबस्त आज वाढवला असला तरी नागरी जीवन विस्कळीत झाले आहे. झालेल्या या दंगलीमुळे 'पोलीस' आपणाला सुरक्षितता देवू शकत नाही. अशी भावना नागरिकात निर्माण झाली आहे. आणि ती खरी ठरावी असेच वर्णन महाराष्ट्राच्या 'शूर' पोलीस खात्याने केले आहे हे नाकारता येणार नाही.

**वासुदेव कुलकर्णी**
**सहसंपादक, दै. नवसंदेश**

चंदिगडचा प्रश्न सुटला.....
आंध्रवादावर तोडगा निघाला.....
गोव्याचा निर्णय झाला.....
नागालँड, मणिपूर, मेघालय.....

# मग बेळगावला उशीर का ?

सु. ल. सोमण

विधान सभेचे अधिवेशन सुरू व्हायच्या वेळेला साधारणतः दरवर्षी सीमा-प्रश्नाचे तुणतुणे वाजवले जाते. मोर्चे निघतात, मुंबई-महाराष्ट्रच्या बंदच्या घोषणा होतात. शिष्टमंडळांच्या दिल्ली-वाऱ्या घडतात. कोरडी आश्वासने येतात आणि, सांधे न बदलता आहे त्याच रूळावरून गाडी धावत राहाते. विधि-मंडळाच्या कार्यक्रमावरील हा 'अजेंडा' आता कायम झाला आहे. गेल्यावर्षी महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. मुंबईतलीच नाही, तर इतर ठिकाण-चीही जनता पोटासाठी रस्त्यावर आली. धान्य गुदामं लुटली गेली. अशा परिस्थितीत देखील, गेल्या विधान-सभेचा पहिला दिवस गाजला तो सीमा प्रश्नाने. चालू अधिवेशनापूर्वी देखील महागाईने नवा उच्चांक गाठलेला असतानाही सत्ताधारी व विरोधी पक्षियांचे शिष्टमंडळ दिल्लीत 'सीमा-वाद' धसास लावण्यासाठी ठाण मांडून बसले होते. हे सगळे नवीन नाही. दरवर्षीच ते घडते. त्या निमित्ताने नित्य नेमाने इथल्या बडव्यांची 'सीमा-स्तोत्रे' गायली जातात. कलियुगातल्या देवळातल्या बडव्यांची जी निष्ठा, तीच ह्या राजकीय बडव्यांचीही. देव पावणे अर्थातच नाही. पण निदान स्तोत्र गाऊन तरी लोकांना भुरळ पाडीत राहाता येते !

कर्नाटक विधानसभेतही, थोड्या फार फरकाने हेच घडते. बेळगाव,

निपाणी आदि भाग कर्नाटकातच असल्याने फारशी स्तोत्रे गायची त्यांच्यावर पाळी येत नाही. पण आहे तो भाग हातचा जाऊ दिला जाणार नाही, महाजन कमिशन रिपोर्ट अंमलात आणण्यासाठी केंद्रावर दडपण आणू वगैरे प्रकार तेथेही चालूच असतो. मधूनच सोलापूर, अक्कलकोट सह संयुक्त कर्नाटकाच्याही घोषणा तिथे सुरू होतात. शिष्टमंडळे, मोर्चे वगैरे प्रकार तिथेही, महाराष्ट्राबरोबरच सुरू होतात. महाराष्ट्र एकीकरण समिती बेळगाव-कारवार भागात गेल्या कित्येक वर्षांपासून जिद्दीने लढत आहे. निवडणूका जिंकीत आहे. पण त्यांचा आवाज फार लहान पडत आहे. कर्नाटक विधानसभेतून त्यांच्या केवळ सभात्यागाच्याच बातम्या येतात. पुढे घोळ चालू होतो तो मोर्च्यांचा, शिष्टमंडळाचाच ! बेळगावात थोडया धरपकडी होतात, दगडफेकी होतात. महाराष्ट्रातले विरोधी पक्षाचे नेते बेळगावला भेटी देऊन येतात. तिथे राणा भिमदेवी थाटातली भाषणे ठोकून येतात. परतले, की पुन्हा पुढील विधानसभा अधिवेशनापर्यंत सारे कसे गप्प गप्प होऊन जातात. सीमा प्रश्न जणू संपलेलाच आहे !

एक नाही, दोन नाही, गेली दहा वर्षे हा देखाव्याचा प्रयोग नियमितपणे चालू आहे. हा प्रश्न सुटून आपल्या हातचे आंदोलनाचे, जनतेच्या भावनांना आवाहन करण्याचे एक हुकमी अस्त्र घालवायला जणू कुणी तयार नाही. केंद्र शासनाला हे भिजतघोंगडे सोयीचे वाटते. कारण कुणालाच दुखवायचा प्रसंग त्यामुळे केंद्रावर येत नाही. राज्य शासनांना केंद्राची सोय पाहूयाची असते. विरोधी पक्षांना चळवळीसाठी 'रेडिमेड' प्रकरण हवेच असते. साहजिकच हे प्रकरण असेच चिघळत राहिले आहे. खऱ्या जिद्दीने आणि तळमळीने धडपड चालू आहे ती फक्त सीमावासियांची. पण ते एकाकी पडतात. त्यांचा आवाज दिल्ली, मुंबई, बंगळूर ह्यांना जाग आणण्याइतपत मोठा नाही. त्यांच्या पेक्षा मोठा आवाज़ निघाला ते प्रश्न पटापट सुटले. महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नानंतरचे प्रश्न देखील सुटले. चंदिगडचा प्रश्न निकालात निघाला. आंध्रसमस्येवर तोडगा शोधला गेला. गोव्याचा सोक्षमोक्ष झाला. नागालँड, मणिपूर, मेघालय यादी हवी तेवढी वाढवता येईल. हे सारे प्रश्न सुटत असताना दुष्काळ, बांगला देश, महागाई आर्थिक आरिष्ट वगैरे कसल्याही अडचणी आल्या नाहीत ! ह्या साऱ्या अडचणी आल्या त्या महाराष्ट्र कर्नाटक सीमावादावरील तोडगा शोधतानाच ! खुद्द इंदिराजींनीच तसे सांगितले तेव्हा त्यासंबंधी काही वादच नाही !

पण हे सारे 'रुटीन' आता बदलेल असे गेल्या काही दिवसातल्या घटनावरून वाटू लागले आहे. कर्नाटक मंत्रिमंडळ गेल्या वर्षापासून स्थिर नाही. काही ना काही घटना घडत जात आहेत आणि मंत्रिमंडळाला हादरे बसत

आहेत. कर्नाटकात घडत असलेल्या घटनांच्या मुळाशी तिथला जातीयवाद काही अंशी कारणीभूत आहे. देवराज अर्स ह्यांचे मंत्रिमंडळच मुळी लिंगायत विरोधात अस्तित्वात आले. वक्कालिग व ब्राह्मण आणि इतर विरुद्ध लिंगायत हे तिथले काही प्रमाणातले द्वंद्व आहे. मुंबईतल्या कर्नाटकीय मंडळीत हिंडताना कित्तूर, सुमित्रा देसाई प्रकरणाचा गाजावाजा अशा गटबाजीतून झाला असावा असे वाटते. ह्या जातीवादातून, खुद्द मंत्रिमंडळ सदस्यच आपल्या वर्चस्वाखालील माध्यमातून एकमेकावर चिखलफेक करतात. तेथले नगर विकास मंत्री, चनवसप्पा ह्याच्यावर त्यांच्या मुलीच्या लग्नात झालेल्या उधळपट्टी-वरून यथेच्छ झोड कॉंग्रेसी वृत्तपत्रांनीच उडवली होती. विधानसभेतही अर्स मंत्रिमंडळाला चनबसप्पा प्रकरणातून सहीसलामत सुटताना त्रास झाला. त्या पाठोपाठ राज्याचे शेतीमंत्री ह्यांच्या-विरुद्ध गदारोळ उठला.

सध्या कर्नाटकात गहजब माजला आहे तो बसवलिंगप्पा प्रकरणाने. मागास जातीचे कॉंग्रेसी मंत्री, बसवलिंगप्पा वाणीने जहाल आहेत. 'मागास वर्गि-यांचा झुंजार नेता' ही बिरुदावली त्यांना हवी आहे. समाजातल्या वरिष्ठ वर्गियावर त्यांनी आपल्या भाषणातून हल्ले चढवले आहेत. त्यातून एक नवीन कडवी जातीय चळवळ कर्नाटकात धुम-सते आहे. लिंगायत, ब्राह्मण, वक्कालिग सर्वांच्याच विरोधात हा लढाऊ मागास वर्गीय आज उभा आहे. काहीशा 'दलित पँथर'च्या स्वरूपात.

'ब्राह्मणांना गीतेसह गटारात फेकून द्या', 'ब्राह्मण, लिंगायत आदिच्या साहित्यावर बहिष्कार घाला' वगैरे घोषणा मागासवर्गियांनी दिलेल्या आहेत. तर त्याच्या विरोधात, पुढार-लेल्या वर्गातल्या विद्यार्थ्यांकडून बसव-लिंगप्पांच्या हकालपट्टीची मागणी !

ह्या साऱ्याचे पर्यवसान, कर्नाटका-तल्या गेल्या पंधरवड्यातल्या दंगलीत घडले. म्हैसूर इथल्या 'आंबेडकर स्कूल ऑफ थॉट' ह्या संस्थेतील एका भाष-णात, श्री. बसवलिंगप्पा ह्यांनी कानडी साहित्यावर टीका केली. कानडी साहित्य पुरेसे पुरोगामी नाही, त्याला फारसा सामाजिक आशय नाही, समाजातल्या खालच्या थरांच्या समस्यांचे आकलन होऊन त्यावर उपाय शोधणे किंवा किमान त्या समस्या वेशीवर टांगणे ही कार्ये कन्नड साहित्यिकांनी केलीच नाहीत हा श्री. बसवलिंगप्पांच्या टीकेचा सारांश होता. ह्या संदर्भात त्यांनी कन्नड साहित्य कवडीमोलाचे असल्या-चेही सांगितले. त्यांच्या ह्या मतात काही अंशी तथ्य आहे असे खुद्द काही कानडी साहित्यिकांनीही मान्य केले. पण सर्वसामान्य विद्यार्थ्यांची कधीच कलु-षित झालेली मने, श्री. बसवलिंगप्पांच्या ह्या विधानांनी आणखीनच भडकली. त्यांना रोखणे मग कुणालाच जमले नाही. राज्यभर दंगली भडकल्या. त्या शमल्या त्या संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजि-नामा घेऊनच !

मुंबईच्या ' कर्नाटक मंडळात ' कानडी वृत्तपत्रांच्या आधारे श्री. जहागिरदार अस्खलित मराठीतून मला कर्नाटकातली सध्याची राजकीय परिस्थिती समजावून सांगत होते. इतरही दोन चार मंडळी तिथे होती. तिथल्या एकंदर चर्चेवरून मला असे जाणवले की, श्री. बसवलिंगप्पा प्रकरणावरून लोकांचे लक्ष, संपूर्ण राज्याला जिव्हाळ्याच्या असलेल्या प्रश्नाकडे वेधता आले, तर ते अर्समंत्रिमंडळाला फायदेशीर ठरले असते. बेळगाव प्रश्नाने तशी संधी ह्या मंत्रिमंडळाला मिळवून दिली. बेळगाव प्रश्नावर महाराष्ट्राचे शिष्टमंडळ दिल्लीला गेले. नंतर बेळगावात, सीमा भागात (म्हणजे महाराष्ट्राच्या बाजूच्या कर्नाटकाच्या सीमा भागात !) कडन्नडिगावर अन्याय्य हल्ले होत गेले. १ नोव्हेंबर हा राज्योत्सव दिन ! त्या दिवशी, बेळगावात मराठी भाषिकांनी कट्टर कन्नडिगांच्या दुकानावर हल्ले चढवले. त्यांची नासधूस केली. निपाणीतही असेच प्रकार घडले. कारवारात कन्नडिगांची छेड म. ए. समितीच्या लोकांनी काढली. कळस म्हणजे, परवा परवा, बेळगावच्या संयुक्त कर्नाटक चौकात लावलेला ध्वज मराठी लोकांनी उखडून फेकून दिला. साहाजिकच कन्नडिग चिडले. बेळगावात दंगल उसळली. त्याचे पडसाद महाराष्ट्रात उठून, पोलिसांच्या साक्षीने इथे मुंबईत, कोल्हापुरात कन्नडिगांना झोडपून काढायचे प्रकार झाले. आज तिकडे कर्नाटकात ठिकठिकाणी पुन्हा दंगली उसळत आहेत. पण कारण वेगळे आहे ! तिथला अंतर्गत जातीय विद्वेष मागे पडला आहे. ह्या दंगलीमुळे काही समस्यांना अर्स मंत्रिमंडळाला तोंड द्यावे लागत असले तरी, लोकांचे लक्ष ह्या प्रश्नाकडे वेधले गेले ते अरस मंत्रिमंडळाच्या पथ्यावर पडेल असे वाटते...

ह्याच मंडळीतले एक श्री. हेगडे नुकतेच धारवाडहून आले होते. त्यांनी तिकडनं आणलेल्या बातम्या, कन्नड वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या बातम्या आणि आपल्याकडच्या मराठी वृत्तपत्रांतल्या बातम्या – बातम्या – बातम्यात एवढे अंतर होते की, कुठल्या बातम्यांवर विश्वास ठेवावा तेच मला समजेनासे झाले. भारत-पाक युद्धाच्या वेळी चोरून का होईना, मधून मधून पाकिस्तान रेडिओ मी ऐकत असायचा. त्याची थोडी आठवण ह्या बातम्या – बातम्यांतल्या विसंगतीने मला झाली. त्याचबरोबर, पोस्ट ऑफिसेस, बँका वगैरे सार्वजनिक ठिकाणी झळकणारी ' एक जनता – एक देश ' ही पोस्टर्सही आठवली ! !

ह्या मंडळीत बसून गप्पा मारताना, बेळगावात घडलेल्या घटनांना कर्नाटक शासनाचा कदाचित् आशिर्वादही असावा, ह्या मराठी आरोपाना, जी पार्श्वभूमी मला ऐकवली गेली त्यावरून पुष्टीच मिळाली. ह्याच गप्पात सीमाप्रश्नावरची एकूण मत प्रणालीही सारांशाने मला उमगली. ह्या मंडळींच्या मते : ' ...एक खुद्द बेळगाव शहर सोडले तर, इतर सीमा

भागाबाबत वाद असा तो नाहीच. आणि खुद्द बेळगाव शहर देखील भौगोलिक, सांस्कृतिक दृष्टया आजूबाजूच्या कानडी प्रदेशाशीच जखडले गेले आहे, मराठी प्रदेशाशी नाही. असाच काहीसा प्रकार निपाणीचा सुद्धा आहे. तेव्हा ही अशी एक दोन शहरे, आजूबाजूच्या कानडी प्रदेशातून अलगद उचलून महाराष्ट्रात टाकण्याने काय साधणार आहे ? आणि ह्याच तत्त्वांवर सोलापूर, अक्कलकोट हा भाग कर्नाटकात घालायचा ठरवला तर ?...ह्या वादात एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. मुळात महाजन कमिशनला कर्नाटकाचा विरोध होता, तर महाराष्ट्र सरकार कमिशनला अनुकूल होते. आणि आता महाजन कमिशनने, सखोल अभ्यासानंतर निर्णय दिल्यावर, केवळ बेळगावच्या बाबतीत तो विरुद्ध गेला म्हणून महाराष्ट्र शासन तो झिडकारते हे कितपत लोकशाहीला धरून आहे ? महाजन अहवाल, काही बाबतीत म्हैसूरवर देखील अन्याय करीत आहे. पण म्हणून, कर्नाटक तो फेटाळून लावीत नाही आहे. आज आमची मागणी एवढीच की, अवाढव्य खर्च करून केंद्र शासनाने जी समिती नेमली, त्या समितीचा अहवाल मानला जावा. केवळ कुणाला तो रुचत नाही म्हणून तो फेटाळून लावला जाऊन सीमा प्रश्न लोंबकळवत ठेवू नये...तिथल्या निवडणुकांचा हवाला देऊन तुम्ही (म्हणजे मी ! ) बेळगावचे महाराष्ट्रात सामिलीकरण झाले पाहिजे असे म्हणता पण निवडणुकांतले मतदान म्हणजे बहुसंख्य लोकांची इच्छा असतेच असे नाही. ह्या दृष्टीने गोव्याचे उदाहरण महाराष्ट्राला फारसे जुने नाही. गोव्याप्रमाणेच, सीमा भागात जनमत कौल घेऊन पहा. तुम्हाला चित्र वेगळेच दिसेल. महाराष्ट्र शासन आणि इथले विरोधी पक्ष ह्या जनमत कौलाला विरोध करतात तो एवढ्याचसाठी. पण तसे करताना गोव्याला एक न्याय, चंदिगढला दुसरा आणि सीमाभागाला मात्र तिसराच असा उरफाटा प्रकार घडतो आहे इकड कुणीच लक्ष देत नाही त्याचं काय ?... आणि राज्य पुनर्रचना समिती, महाजन कमिशनने जे दिले आणि जे न्याय्य आहे ते आज पंधरा-सोळा वर्षांनी सोडून द्यायला कुठलाही कन्नडिग तयार होणार नाही. बसवलिंगप्पा किंवा इतर जातीयवादी प्रकरणांनी विभागलेली जनता ह्या प्रश्नावर एकवटून उभी राहील. वास्तवात हे सारे प्रकरणच दुर्दैवी आहे. प्रत्येक सीमेवर काही वादग्रस्त भाग राहाणारच. त्यासंबंधात किती ताणून धरायचे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. बरे हे वाद देशांतर्गतच आहेत, आंतरराष्ट्रीय नाहीत. केरळ, आंध्र ह्या राज्यांबरोबरही काही वाद कर्नाटकाचे आहेतच. पण तिथे असे हिंसक दंगलींचे प्रकार घडत नाहीत. मग महाराष्ट्राशीच ते घडवून आणण्यात कर्नाटकाला काय स्वारस्य ? ...ह्या तंटयांवर दोन्ही भाषिक गटांनी थोडे थोडे पडते घ्यायला हवे. 'सोलापूर' बाबत आम्ही तो संयम दाखवतो.

बेळगावबाबत महाराष्ट्राने असा संयम दाखवला पाहिजे....त्यांतूनही वादाला तोंड फुटल्यावर नेमलेल्या समितीने दिलेले निर्णय उभय पक्षांनी पाळावेत असे आम्ही म्हटले तर ते तार्किकदृष्ट्या विसंगत कसे? उलट महाराष्ट्राचीच भूमिका ह्या बाबतीत अत्यंत विसंगत वाटते. विशेषत: महाजन अहवालाच्या संदर्भात तरी!

कर्नाटक मंडळाच्या लोकांबरोबरच्या बैठकीत व्यक्त झालेल्या मतांचा गोषवारा आणि तिथेच मला वाचून (व भाषांतरीत करून) सांगितल्या गेलेल्या कन्नड वृत्तपत्रातल्या मतांचा तोंडवळा ह्यात खूपच साम्य आहे. साधारणत: महाजन अहवालाचा आधार घेऊन त्यावर शिक्कामोर्तब करून हा प्रश्न एकदा कायमचा मिटवून टाकावा असे ह्या मंडळींना वाटते. अलिकडेच बंगलोर येथे कर्नाटक प्रदेश काँग्रेसचे चिटणीस श्री. भास्कर शेट्टी ह्यांनीही ह्या संदर्भात रोख-ठोक भाषा वापरून केंद्राला निर्वाणीचा इशारा दिलेला आहे. 'महाजन निवाडा तात्काळ अंमलात आणा, अन्यथा परिस्थिती काबूबाहेर जाईल!' हा तो श्री. शेट्टींचा निर्वाणीचा इशारा!!

महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद दरवर्षी नियमाप्रमाणे उफाळून आला, की महाराष्ट्रीय बाजू नेहमीच आपल्याला ऐकू येते. सीमा भागातल्या लोकांविषयीच्या सहानुभूतीमुळे ती भूमिका आपल्याला चटकन उमगतेही. चालू दंगलीतही, म्हणूनच, बेळगावकरांवरील अत्याचार आपल्याला चटकन जाणवले. त्यांची झालेली तीव्र प्रतिक्रीयाही समर्थनीय वाटली. आणि आपले हे विचार, गेल्या १५-१६ वर्षांतल्या क्रिया-प्रतिक्रियांतून इतके पक्के झाले झाले आहेत, ते सर्वांच्या इतक्या परिचयाचे आहेत की, ह्या प्रकरणाला कानडी बाजूही काही आहे हेच आपल्याला जाणवत नाही. म्हणूनच, चालू दंगली उसळल्यानंतर, दंगलींचा मागोवा न घेता, ठराविक मराठी नेत्यांच्या मागे न फिरता, ही वेगळी बाजू मुंबईत राहूनच समजून घ्यायचा मी प्रयत्न केला. सुदैवाने मुंबईत कानडी समाजही भरपूर आहे, कन्नड वृत्तपत्रेही उपलब्ध आहेत. त्यांची बाजू समजून घेत असताना एक गोष्ट निश्चितपणे जाणवली. त्यांच्या प्रतिपादनांतही एक तार्किक सुसंगती आहे. त्यांच्या मतप्रणालीत फार मोठी एकवाक्यता आहे; आणि केंद्राचा फुका बाऊ न करता, कर्नाटक शासनही सर्व कन्नडिगांच्या मागे सीमाप्रश्नावर ठामपणे उभे आहे. खुद्द काँग्रेसचे कर्नाटकीय पदाधिकारीही महाजन अहवाल अंमलात आणा नाहीतर परिणामांना तयार रहा असे ठणकावून सांगू शकतात ह्यातच सारे आले. फार काय, पण कन्नड मंडळीच जेव्हा सांगतात, की 'कित्तुर, बसवलिंगप्पा आदि प्रकरणांमुळे असे सरकार कोसळणार असे वाटत होते त्या सरकारला सीमा प्रश्नामुळे अभय मिळाले आहे.' तेव्हा ह्या प्रश्नावरील त्यांच्या

एकात्म भावनेचे प्रदर्शन होते.

शिवसेनेविषयीही ह्या कन्नड मंडळींच्या भावना अतिशय प्रखर दिसल्या. ‘कन्नडिगासह सर्व दाक्षिणात्यांविरुद्ध उभी असलेली, अराष्ट्रीय, हिंसक चळवळ’ असेच शिवसेनेचे स्वरूप त्यांना जाणवते. ‘शिवसेने’मुळेच आज हा प्रश्न चिघळला आहे, त्याला हिंसक वळण लागले आहे... ‘इथल्या दाक्षिणात्य हॉटेलांमधली अनेक हॉटेल्स कारवारी लोकांची आहेत. कारवारवर तुम्ही एकीकडे दावा सांगता आणि दुसरीकडे, मुंबईत त्यांचीच हॉटेले जाळता, तोडता, मोडता! हा काय प्रकार आहे?’ चेंबूरचे कामत आपली व्यथा मांडताना म्हणाले. तर धारवाडचे श्री. हेगडे सांगत होते, ‘... कर्नाटकातला सुबुद्ध नागरिक शिवाजीला मानतोच. इतकेच नाहीतर सामान्य जनताही मानते. पण शिवाजीमहाराजांच्या नावाखाली, दाक्षिणात्य द्वेषाला शिवसेना जे खतपाणी घालते त्याला आमचा विरोध आहे. आणि त्यातून, चिडलेल्या विद्यार्थ्यांकडून शिवाजी महाराजांच्या चित्रांचा कुठे अवमानही होतो. परंतु हा अवमान शिवाजी ह्या राष्ट्रपुरुषाचा नसतो, तर फॅसिस्ट शिवसेनेच्या प्रतीकाचा असतो...’

कन्नडिगांच्या प्रतिक्रिया साधारण ह्या अशा आहेत. त्यांची वृत्तपत्रे त्यांना मराठी भाषिकांनी केलेल्या अत्याचारांच्या कहाण्या ऐकवीत असतात. सांगली, कोल्हापूर आदी सीमा भागातून कन्नडिगांवर होणाऱ्या अत्याचारांमुळे ‘कन्नड निर्वासित’ शेजारच्या बेळगाव, विजापूर जिल्ह्यात ‘हजारोंच्या संख्येत’ येत असल्याच्या बातम्या त्यांना ऐकवल्या जातात. मुंबईत कन्नडिगांच्या संपत्तीची नासधूस सुरू असल्याचे सांगण्यात येते. ह्या नासधूशीचे आकडे लाखाच्या घरात असल्याचे सांगितले जाते. त्याच्या साहाजिक प्रतिक्रिया मग कन्नड शहरातून उमटल्याचे आपल्याला मराठी वृत्तपत्रांतून वाचायला मिळते. ‘अथणी’ची एक बातमी, कन्नड वृत्तपत्रे सांगतात, तिथल्या मराठी कॉन्ट्रॅक्टरची अरेरावी वर्तवून. मराठी वृत्तपत्रे त्याचे समर्थन करून कन्नड जमावाने त्याला ठेचून ठेचून मारल्याचे सांगतात.

बातम्या दोन्ही बाजूंनी अतिरंजित व विपर्यस्तव स्वरूपात प्रसृत होत असल्या तरी एक गोष्ट निश्चित की, दोन्ही राज्य शासनांनी सध्याच्या परिस्थितीवरून, जनतेचे लक्ष सीमा प्रश्नावर केंद्रित करण्यासाठी राखून ठेवलेले हे कायमचे ‘पिल्लू’ आता पिल्लू न राहाता त्यांच्या कह्याबाहेर जाऊ पाहात आहे. दोन्ही राज्यात दंगलीचा डोंब उसळला आहे. आणि परिस्थिती काबूत येत नाही असे पाहिल्यावर केंद्र शासन खडबडून जागे होत आहे. ‘हिंसाचार बंद झाल्याशिवाय तोडगा शोधून काढणे शक्य नाही’, असे आज इंदिराजी, उमाशंकर दीक्षित दिल्लीत बसून सांगत आहेत. गेली सतरा वर्षे काय सतत हिंसाचारच चालत होता, तोडगा न शोधायला? आणि आता हिंसाचार बंद झाल्यावर किंवा दोन्ही

बाजूंनी आंदोलन मागे घेतल्यावर तरी प्रश्न धसास लागेल याची शाश्वती काय ? गेल्या सतरा वर्षात आश्वासने काय कमी मिळाली आहेत ? उलट गेल्या काही वर्षातला अशा आंदोलनाचा इतिहास पाहू गेल्यास, जिथे आश्वासनावर अवलंबून आंदोलने मागे घेतली जातात, तिथे बहुधा तोंडाला पाने पुसण्याचाच प्रकार घडून येतो. जिथे आश्वासनांची दखल न घेता आंदोलन पुढेच रेटली जातात त्या ठिकाणी मात्र शासन नमते. आंदोलने हिंसक असली तर ते जास्तच लवकर नमते असा अनुभव आहे.

ह्या संदर्भात महाराष्ट्र-कर्नाटक वादाला लागलेले आजचे वळण केंद्रावर पुरेसा दबाव आणू शकेल असे वाटते. ॐ शांतिः शांतिः शांतिचे जप सर्वत्र जपले जात असता आणि आंदोलने हिंसक असू नयेत हे जाणवत असताही केंद्र शासनाचा सध्याचा जो खाक्या आहे त्यामध्ये शांततापूर्ण आंदोलनाला अर्थच उरलेला नाही. या आंदोलनात आज कन्नड नेते कडक भाषा वापरीत आहेत; उग्र आंदोलनांना पाठिंबा देत आहेत. महाराष्ट्रातही दंगली घडताहेतच. मुंबई-बंगळूर महामार्ग रोखायची भाषा बोलली जात आहे. म्हणूनच, केंद्र शासन आता तरी पावले टाकील, १७ वर्षापासून कुजत पडलेला प्रश्न सोडवील अशी आशा वाटते आहे.

आणि अशी आशा पल्लवित होत असताना कर्नाटक शासनाप्रमाणे महाराष्ट्र शासन, इथला काँग्रेस पक्ष सीमावासियामागे ठामपणे उभा राहील का ? की केंद्राला, इंदिराजींना अडचणीत टाकायला नको, असली भूमिका घेऊन इथली काँग्रेस गप्प बसून राहील ? काँग्रेसनेच आंदोलनाचा रेटा लावला, त्यांच्या मंत्र्यांनीच राजीनामे द्यायला सुरुवात केली की मगच केंद्र शासन पावले टाकते हाही आंध्रच्या प्रश्नात आलेला अनुभव इथे विचारात घेतला पाहिजे...

ह्या प्रश्न अशा रीतीने धसास लागू पाहात असताना, एका वेगळ्या सूचनेचाही इथे विचार केल्यास अस्थायी ठरणार नाही. ही सूचना नवी नाही. चार वर्षापूर्वी मी गोव्यात गेलो असता तिथले त्यावेळचे फुटीर म. गो. आमदार श्री. टोनी फर्नांडिस (आता काँग्रेस !) ह्यांच्याकडून मला ऐकायला मिळाली होती. बेळगाव, निपाणी, कारवारचा प्रश्न, महाराष्ट्र व कर्नाटक ह्यांच्याच चौकटीत सोडवल्यास, कसाही निर्णय घेतला तरी ह्या दोन राज्यात कटुत्व निर्माण होणारच. गोव्याचे राजकारण, काँग्रेस, कम्युनिस्ट, जनसंघ, समाजवादी ह्या सर्वांनी जंगजंग पछाडून देखील मगोयुगोच्या वर्तुळाबाहेर पडत नाही. एक प्रकारे राजकीय डबकेच तिथे निर्माण झाले आहे. गोव्याने महाराष्ट्रात सामील व्हायला स्पष्ट नकार दिला आहे. तेव्हा या परिस्थितीत गोव्यातली राजकीय कोंडी फोडायची असेल, गोव्याला भारतीय राजकारणाच्या प्रवाहात आणून सोडायचे असेल तर एकतर गोव्याचे शेजारच्या महाराष्ट्रात

विलीनीकरण करावे, किंवा स्वतंत्र राज्याचा दर्जा देऊन विशाल गोमांतकाची निर्मिती करावी. पैकी पहिला पर्याय गोमांतकीयांनी नाकारलेला आहे, तेव्हा सूचना अशी की, वादग्रस्त सीमा प्रदेश, सध्याचा गोवा प्रदेश व रत्नागिरी जिल्ह्याचा सावतवाडी वगैरे विभाग ह्यांना एकत्रित आणून विशाल गोमंतकाची निर्मिती करावी. ह्या उपायाने सीमा प्रश्नाची परस्पर उकल होईल व गोव्यातली राजकीय कोंडीही फुटेल. बेळगाव, कारवार, धारवाड, गोवा ह्यांच्यात भौगोलिक, भाषिक सुसूत्रता आहेच, तेव्हा तीही अडचण विशाल गोमांतकाच्या निर्मितीआड येणार नाही.

महाराष्ट्रीयनांना ही सूचना पचवणे जड जाईल ह्याची मला जाणीव आहे. परंतु मी मागे गोव्यात बोललो असता तिथे ह्या योजनेचे स्वागतच झालेले मला आढळले. खुद्द बेळगाव, कारवार, धारवाड ह्या विभागात ही योजना मान्य आहे असे मला वाटते. कर्नाटकात राहण्याऐवजी, महाराष्ट्रात जायला मिळत नसेल तर विशाल गोमंतकाला त्यांची तयारी आहे अशी माझी माहिती आहे. कर्नाटकात किंवा महाराष्ट्रात हा तोडगा फारसा रुचणार नाही. सीमाभाग महाराष्ट्रात विलीन होणे किंवा कायमचा कर्नाटकात राहाणे ह्यापैकी कोणताही तोडगा वरील तोडग्यापेक्षा जास्त असंतोष ह्या राज्यांमध्ये पसरवील हे मात्र निश्चित. त्यापेक्षा वेगळ्या राज्याचा तोडगा दोन्ही राज्यांना कमीत कमी नाखूश करील. सीमा प्रश्न सोडवताना एखाद्या राज्याची नाखुशी स्वीकारण्यापेक्षा, दोन्ही राज्यांना सारखा न्याय देऊन शिवाय गोव्याची कोंडी फोडता आली तर तेच अधिक श्रेयस्कर ठरणार नाही का ?

अनेक पर्यायांतला हा एक पर्याय आहे. तो किंवा दुसरा कोणताही पर्याय स्वीकारून १७ वर्षांपासून कुजत पडलेला हा प्रश्न आज शासनानं सोडवलाच पाहिजे. आश्वासनांवर विसंबून न राहता, महाराष्ट्र, कर्नाटक, सीमावासीय ह्यांनी रेटा देऊन हा प्रश्न आज मिटवलाच पाहिजे ! नाहीतर पुन्हा आहेच ये रे माझ्या मागल्या, सीमावासियांच्या जिवावर ! ● ● ●


# फिडेल, चे आणि क्रांती

लेखक : अरुण साधू

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

पुस्तके

# हृद्य

## विचार विलसिते

**प्रा. ग. भा. जोशी**

श्री. विठ्ठलरावांची लेखणी मोठी प्रसन्न आणि नमुनेदार आहे. या लेखणीला गेल्या ७५ वर्षातील अनेक व्यक्ती, घटना, प्रसंग परिचत आहेत. काही जवळून काही लांबून अनेकांच्या अनेक आठवणी ती जेव्हा कथन करते तेव्हा भावनेनं चिंब होते, वात्सल्याने भारावून जाते. मानवी मनाचे सारे सारे कंगोरे, त्यातील वारीक सारीक छटा सूक्ष्म नजरेने टिपते. कधी उतत नाही, मातत नाही, तोल सोडीत नाही. कारण सखोल आणि व्यापक विचाराची मांड तिला लाभलेली आहे. अशी मोठी लोभस अन वहुगुणी लेखणी जेव्हा साहित्याचा, चित्रपटाचा, कवीलेखकांचा, सामाजिक प्रश्नांचा वेध घेते तेव्हा वाचक हरखून जातो, प्रसंगी हेलावतो प्रसंगी धीर गंभीर होतो. विचार मग्न होतो. हेच या लेखणीचे मोठे सामर्थ्य आहे. या लेखणीने आजवर खूप पाहिले, साहिले, अनुभवलं जे जे उत्कट वाटले ते ते सारे कवटाळले. जिथं जिथं अन्याय झाला तिथे तिथे कठोरपणे फटकारले. असहाय्यतेला मायेने पांघरले. भव्यतेला, उदात्ततेला, शरण जाणे; दिव्यत्त्वाला आणि उदार, मनस्वी व्यक्तीला आंजारणे गोंजारणे, प्रसंगी ताठरपणे वर्तमान किंवा भूतकालीन अन्यायावर तुटून पडणे हे सुद्धा या लेखणीचे वैशिष्टच आह.

ही लेखणी साधी, सरळ, गतीमान अन प्रवाही आहे. ती बोजड नाही, कृत्रिम नाही, अलंकृत नाही. तिला वृद्धत्व जाणवलेले नाही. यौवनानं रसरसलेली आणि सर्वस्पर्शी आहे. अलिकडच्या काही वर्षात तिने स्पर्शिलेल्या लेखांचा हा एक नमुनेदार आणि उत्कृष्ट संग्रह 'विचार विलसिते'

या पुस्तकात एकूण २४ लेख आहेत. स्थूलमानाने वर्गीकरण करायचेच म्हटले तर 'धर्मान्तिरे', घनपाठी वेदो नारायण' 'उर्दू आणि मुसलमान' 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्' 'जिवंत मराठी' सारखे लेख विचारांचा विलास दाखवितात.

'जवानमर्द संभाजी' 'महात्मा जोतीराव', 'कविराज चंद्रशेखर', 'भास्करराव आणि माधवराव' 'ख्रिस्ताचा एक हिंदुशिष्य' हे व्यक्तित्वाचा शोध घेत घेत पारंपरिक कल्पना, समज, अपसमज यांचा गुंता सोडवीत व्यक्तिदर्शन घडवितात. 'गॉन वुइथ द विंड' सारख्या चित्रपटांचा मनोज्ञ आस्वाद घेतात तर 'हिराबाईची शोकांतिका' 'चापयाचे

आजोबा', 'एक ज्ञानदीप मालवला' 'रसिकराजा रामूभय्या' या लेखात लेखणी मायेने, भावनेने, त्यांच्या कर्तृत्वाने भारावून जाते.

'शिक्षा', 'एरियल टू मिरांडा', 'शिल्लक काय राहिले,' 'ग्लॉकोमा' 'ऐशींच्या उंबरठ्यावर' यालेखात लेखणी अधिक चिंतनशील होते.

श्री. घाटे एका लेखात लिहितात मन अत्यंत अस्वस्थ होते. झोप येत नाही. मानसशास्त्राचा मी विद्यार्थी असल्याने आणि थोडीबहुत कवीची कल्पनाशक्ती जवळ असल्यामुळे मी अनेकांच्या मनात डोकावून पाहातो'— संभाजी राजांना; रमाबाईंना, हिराबाईंना, माधवरावांना, इरावतीबाईंना, शेजवलकरांना ते अत्यंत सहृदयतेने जाणून घेतात. त्यांच्या मनाचा तळ पाहण्याचा प्रयत्न करतात.

'जवानमर्द संभाजी'ला वरील दृष्टिकोनामुळे जवळून पहातात.

राजांच्यावर गेल्या ५।५० वर्षांत जो बदनामीकारक मजकूर लिहिला गेला त्याचा वेध घेतात. विशेषतः संभाजीराजांचे दारूचे व्यसन आणि बदफैलीपणा...अशावेळी त्यांची लेखणी धारदार होते, तिखट होते, प्रसंगी वक्र होते... 'श्रावणीच्या दिवशी एका विशिष्ट पेयाचे पान करणे हाच ज्यांचा पानाविषयीचा अनुभव अशा लेखकांनी संभाजीराजांबद्दल बराच गवगवा केला आणि अतिरंजित वर्णने केली'—या वाक्यातील मर्म सहज लक्षात यावे. 'संभाजीराजे ४०।५० मैलाची घोडदौड करून थकून भागून आल्यावर बहुधा एखाददुसरा पेग घेत असतील' असे सांगतात. रामगणेशानाही याबाबत ते समजून घेण्याचा प्रयत्न करतात.

'कदाचित राजे कधी कलशासह रंगात आले म्हणजे (आणि राजांनी रंगात येऊ नये असे थोडेच आहे?) बदाम-पिस्ते घातलेली दुधिया भांग सेवन करत असतील'—कर्तृत्ववान व्यक्तीच्या व्यसनाची तारीफ किंवा प्रशंसा न करता ते किती हळुवारपणे सहजपणे समर्थन करतात हे पहाण्यासारखे आहे. 'व्यसन माणसाला कृतिशून्य करते, विवेक भ्रष्ट करते' असा व्यसनाचा धिःकार करूनच राजांचे कर्तृत्व सांगतात. विशेष म्हणजे अशी बदनामी करणाऱ्याची जशी त्यांनी हजेरी घेतलेली आहे तसंच अलिकडे प्रतिक्रिया म्हणून राजाना 'व्हाईट वॉश' करणाऱ्या प्रवृत्तीचा ते निषेध करतात. हा त्यांचा वैचारिक समतोलपणा लक्षात घेण्यासारखा आहे. शिवाजी राजांनी 'हिंदवी स्वराज्य' आणि संभाजी राजांनी 'हिंदवी धर्म' स्थापन करण्याच्या दूरदृष्टीचा ते गौरव करतात आणि 'अशी पिता-पुत्रांची जोडी जगात परत होणे नाही' असा सिद्धांत मांडतात.

'धर्मांतराचा प्रश्न' अशाच सहजतेने विचारात घेतात. सिस्टर निवेदिता, पंडिता रमाबाई, रे. टिळक, डॉ. आंबेडकर अशा अनेक व्यक्तींचा शोध बोध घेतात. धर्मांतराची पार्श्वभूमी सांगतात. त्यांच्या विचारांचे समर्थन

करतात. हिंदु, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन इ. धर्माची चर्चा करतात. गहन आणि किचकट विषय अगदी लीलया हाताळतात. रमाबाई ख्रिस्ती का झाल्या ? असा प्रश्न विचारून ' मनःशांती मिळवण्यासाठी ' असे सांगतात. रे. टिळकांना ते असाच प्रश्न विचारतात. त्यावर ' फर्स्ट कन्व्हिक्शन ' देन कन्व्हर्शन ' असे टिळकांनी उत्तर दिल्यावर त्याचा मागोवा घेतात. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराची प्रेरणा नकारात्मक होती, भावात्मक नव्हती असे मत मांडून त्यांची बाजू समजावून घेतात. रमाबाईच्या काळातील सामाजिक परिस्थितीचे समालोचन करतात अन् शेवटी ' मी बाईंना दोष देत नाही. बाई हिंदु राहिल्या असत्या तर फार बरे झाले असते. ' असे मत व्यक्त करतात. ' डोके फिरले (डोकेच ते फिरते कधी कधी)' असे किंवा ' अस्पृश्याचे बौद्ध धर्मावर प्रेम नव्हते. प्रेम बसण्यास काही नाही तरी निदान थोडीबहुत ओळख असावी लागते...' असे सहज गंमतीने सांगतात पण त्यातून एखाद तत्त्व समर्थन करतात हे विलक्षण आहे.

'म. जोतीरावाचा काल, कर्तृत्व, तत्कालीन समाजरचना, जाती व्यवस्था, ब्राह्मण्य, समकालीन सुधारक यांचे सुबोध चित्र रेखाटतात आणि जाता जाता अपमानित जोतीला झोप लागत नाही. वडील सांगतात ' अरे झाडांना पाणी घाल–' जोतीबा तंद्रीतच पुटपुटतात. ' घालतो. साऱ्याच झाडांना पाणी घालतो. महार मांगांना, माळ्या कोळयांना, ब्राह्मणांना '––जन्मभर जोतीराव साऱ्याच झाडांना पाणी घालीत राहिले–या एक-दोन वाक्यातच जोतीरावांच्या कर्तृत्वाचे समर्पक विवेचन करतात. फुल्यांच्या कार्याला पाठबळ मिळालेल्या महर्षी रानड्यांचा गौरव करतात. ही समकालीन मंडळी जर एकमेकांना दररोज भेटती तर समजूतदारपणा अधिक वाढला असता आणि कार्याला गती आली असती असे मार्मिक विधान करतात.

' घनपाठी वेदोनारायणांचा ' व त्यांचा सत्कार करणाऱ्यांचा ते निषेध करतात. वेदविद्येबद्दल नितांत आदर ठेऊन घनपाठ पद्धतीला ते दोष देतात. आधुनिक साधनांचा वापर करावा असे ते सुचवितात. प्रा. याकोबी, मॅक्समुल्लर, विंटर निटस्, डॉ. भांडारकर, लोकमान्य टिळक, डॉ. आंबेडकर, या वेदोनारायणांना आदरपूर्वक वंदन करतात. ' उर्दू मुसलमान ' या लेखात हिंदु मुस्लिम धर्म, भाषा, सत्ता, संघर्ष या बाबतची सखोल चर्चा करतात. गुणदोष दाखवितात, भाषेचा डौल सांगतात. हिंदु-मुस्लिम पृथक्‌पणा कसा नष्ट करता येईल यावर उपाय सुचवितात. एकत्र येण्याने, उर्दू ही मुसलमानांची भाषा आहे हा गैरसमज काढण्याने, मुसलमानांनी भारत हीच मायभूमी आहे असे मानण्यानेच तेढ कमी होईल असा निष्कर्ष काढतात. ' धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम् ' या वैचारिक लेखात ' ज्यू ' ख्रिश्चन यांचा इतिहास सांगतात. ख्रिस्ताच्या जीवनाचा मागोवा

घेतात धर्माची व्याप्ती, कार्य यांचे महत्त्व विशद करतात.

' जिवंत मराठी ' हा भाषाशास्त्राचा मागोवा घेणारा लेख; शब्द, भाषा, वाक्प्रचार कसे निर्माण होतात याची सोदाहरण चर्चा करतात. भाषा समृद्धीकरिता अहंगड टाकला पाहिजे व जिवंत मराठीची भर घालून भाषा वा वाङ्मय समृद्ध केले पाहिजे असे सांगतात. ' माझे आवडते पुस्तक ' व पुनर्भेटी—पण कशासाठी ' ' प्रेम आणि माधवराव ' या लेखात वाङ्मयीन दृष्टी व सृष्टी स्पष्ट-जाणवते. 'अरेबियन नार्टटस ' हे सुरस व चमत्कारिक गोष्टीचे पुस्तक आवडल्याचे दिलखुलासपणे मान्य करतात. येथे श्री. घाटे एखाद्या बालकाप्रमाणे अल्लड होतात. साहित्यातील पात्रे पुर्नभेटीने काय देतात हे ते सांगतात. ' कविराज चंद्रशेखर ' ' प्रेम व माधवराव ' ' भास्करराव व माधवराव ' हे विषय या व्यक्ती तर घाट्यांच्या जिव्हाळ्याच्या; कौटुंबिक ऋणानुबंध असेलेल्या. चंद्रशेखरांचे, भास्कररावांचे, माधवरावांचे, शब्दचित्र रेखाटताना; त्यांच्या साहित्याचा आस्वाद घेताना विठ्ठलरावांची लेखणी चंद्रमण्याप्रमाणे पाझरू लागते. तिला नवे धुमारे फुटू लागतात. ती एकरूप होऊन जीवनानंद, आणि काव्यानंद कशी लुटते ते मुळातील लेख वाचल्यावरच त्याची कल्पना येऊ शकेल.

' हिराबाईची शोकांतिका '— एक मनोज्ञ लेख; सारा जिव्हाळा, सहानुभूती एकवटून त्यांनी हिराबाईंना समजावून घेतले आहे. हिराबाईंना ज्यांनी फसवले, विश्वासघात केला, अर्ध्या वाटेवर सोडले त्यांच्यावर ते संतापतात. बाई दुःखात जन्मल्या.


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

**ब. मो. पुरंदरे**

**किमत : सात रुपये**

**राजहंस प्रकाशन**

दुःखात गेल्या. ग्रीक शोकांतिका फुकट गेलीस ग बाय, फुकट गेलीस ' त्यांची लेखणी अश्रूंनी पाझरते.

'चाफ्यांचे आजोबा ' — इतिहास संशोधक त्र्यं. शं. शेजवलकर;

'एक ज्ञानदीप मालवला '— इरावतीबाई कर्वे—

'रसिकराज रामूभय्या '— यांची स्मृतीचित्रे 'काही म्हातारे आणि एक म्हातारीची ' आठवण करून देणारी ठरावीत इतकी सजीव, रेखीव वाटतात. तोच चाफ्याचा सुगंध, ज्ञानदीप आणि रसिकता यांची सोबत घेऊन विठ्ठलराव आपल्या जीवनाची वाटचाल करीत आहेत...

'ऐशीच्या उंबरठ्यावर ' उभं राहून गत जीवनात डोकावतात; 'ग्लॉकोमा ' झाल्यावर अंधार यात्रेचे वर्णन करतात. डोळे, कान, स्पर्शेंद्रिये यांच्या कामाचा वेध घेऊन अन्तःचक्षुसमोर त्यांना शिवाजी महाराज दिसतात, बाजी-रावाचा जीवनपट येतो. त्यात ते सुखा-वतात. त्यांच्याशी संवाद करू लागतात. मृत्युशय्येवर असणारी पत्नी 'मुलांना सांभाळा ' म्हणते आणि विठ्ठलराव दाटल्या आवाजात विचारतात, 'मला कोण सांभाळील ' असे अनेक अन्तःकरण हेलावून सोडणारे प्रसंग चितारतात. तसेच गत जीवनाकडे संयत होऊन जेव्हा ते पहातात तेव्हा जीवन नाट्यातील विविध भूमिका, सुखदुःखे, गुणदोष यांचा ते हळुवारपणे मागोवा घेतात. इतक्या संयमी आणि तटस्थ वृत्तीने ते जगतात याचे राहून राहून कौतुक वाटते हे दोन्ही लेख म्हणजे 'मास्टर पीस 'च आहेत !

जीवनाविषयीची कृतज्ञता आणि जीवन जगण्याची जिद्द हे तर विठ्ठल-रावांचे वैशिष्ठ्य. जीवनाचा लळा लागला आहे. रसरूप-गंधात रंगलो आहे. जीवनाच्या मैफलीला दाद देत आहे असे ते आत्मविश्वासपूर्वक सांगतात.

अशा सरस ग्रंथाला रसिक वाचक मनःपूर्वक दाद देतील असा भरवसा वाटतो. ◻

**विचार विलसिते**

लेखक : वि. द. घाटे
मौज प्रकाशन
१६० पृष्ठे.
किंमत १५ रु.

मध्यांतर

# अजब न्याय वर्तुळाचा

## ब्रेख्तचा मराठी अवतार

'मुंबई मराठी साहित्य संघ' आणि जर्मन सरकारचे सांस्कृतिक खाते यांच्यातील सहकाराने ब्रेख्तच्या 'कॉकेशियन चॉक सर्कल' या नाटकाचे चिं. त्र्यं. खानोलकरकृत 'अजब न्याय वर्तुळाचा' हे रूपांतर गेल्या आठवड्यात रंगमंचावर आले. या सांस्कृतिक देवघेवीच्या योजनेनुसार विजया मेहता जर्मनीला जाऊन आल्या आणि Beriner Ensemble चे बेनेविट्स हे जर्मन दिग्दर्शक मुंबईच्या साहित्य संघात आले होते. 'अजब न्याय वर्तुळाचा' हा नाट्यप्रयोग मेहता–बेनेविट्झ यांनी दिग्दर्शित केलेला असून, माधव खाडिलकर हे अल्काझीशिष्य या प्रयोगाचे सहाय्यक दिग्दर्शक आहेत. यापूर्वी मुंबईकरांनी अल्काझींनी राष्ट्रीय नाट्यशाळेतर्फे आणलेली Three Penny Opera' आणि 'Caucasian Chalk Circle' ही ब्रेख्तची दोन नाटके पाहिली आहेत. त्यातील पहिल्या नाट्यप्रयोगाचे दिग्दर्शकही बेनेविट्झ हेच होते. त्यानंतर 'रंगायन'तर्फे विजयाबाईंनी दिग्दर्शित केलेला 'देवाजीने करुणा केली' (Good Woman Of Szechwan) हाही नाट्यप्रयोग मुंबईकरांनी पाहिला आहे. काही प्रेक्षकांनी अल्काझीकन्या अमल अलाना हिने दिग्दर्शित केलेला ब्रेख्तच्या त्याच नाटकाचा इंग्रजी प्रयोग पाहिला असेल. ही यादी देण्याचा उद्देश असा की, गेलीकाही वर्षे ब्रेख्तच्या रंगभूमीचा आपण विशेष विचार करीत आहोत. भारतीय लोकनाट्याशी ब्रेख्तशैलीचा असणारा अन्वय ध्यानी घेऊन हे चालले आहे हे उघडच आहे. कोणत्याही एका नाटककाराच्या वा नाट्यतत्त्वज्ञानाच्या लाटेत वाहून जाण्यापूर्वी त्या तत्त्वज्ञानाचा सांगोपांग अभ्यास होणे आणि त्यातून आपल्या प्रतिक्रियांचा तोल सावरणे अत्यावश्यक आहे. तसेच ब्रेख्तच्या रंगभूमीचा विचार करताना ती एका विशिष्ट रंगभूमीविरुद्ध प्रतिक्रिया होती हेही विसरून चालणार नाही. जर्मन काव्यनाटके व अभिनयाची भावविवश शैली–त्यातील अतीनाट्य या संदर्भाशिवाय ब्रेख्त समजून घेता येणार नाही.

ब्रेख्तच्या रंगभूमीविषयक विचारात केंद्रस्थानी आहे तो 'Verfremdund's Effekt'चा म्हणजेच परस्थपणाचा विचार. प्रेक्षकाने स्वतःची विश्लेषणबुद्धी जागरूक ठेवावी, केवळ मधुर

आभासाच्या जगात स्वत:ला विसरण्याची सवय ठेवू नये हा विचार वरील परस्थपणाच्या मुळाशी आहे. 'नाटक म्हणजे सत्यसृष्टीचा आभास' – 'वास्तवाची प्रतिकृती' या तत्त्वावर गेल्या पंचवीस–तीस वर्षांत जे अनेक आघात केले गेले त्यातला ब्रेख्तचा नाट्यविचार प्रमुख आहे. ॲरिस्टॉटलच्या साऱ्या संकेतांना झुगारून देणारे ब्रेख्तचे नाटक कथाकथनपर आहे. पण त्याचा मूळ हेतू मात्र कथा सांगणे हा नसून सामाजिक वास्तवाची चिरफाड करणे हा असतो. एका माणसाच्या दृष्टिकोनातून आपण वेगवेगळे कथाभाग पाहतो. (येथे मराठी रंगभूमीवरील आद्यनाटकातील सूत्रधार, दशावतारातील नायकजी, तमाशातील सोंगाड्या आणि कीर्तनातील कीर्तनकाराची भूमिका अशी विविध समांतर भारतीय रूपे डोळ्यासमीर येतात.) कथाभागाच्या महत्त्वपूर्ण वळणावर येणारी गाणी ही इतर रंगमंचावर प्रेक्षकांच्या दिलखुशीसाठी येतात तर ब्रेख्तच्या नाटकांमध्ये कधी प्रसंगाचा 'मूड' स्थिर करण्यासाठी तर अधिक वेळा पूर्वील कथाभागातील विचार घनीभूत करण्यासाठी येतात. ब्रेख्तच्या रंगमंचाचा लवचिकपणा, त्याच्या नाटकातील काव्यात्मता आणि मानवाचा वस्तुस्थितीशी चाललेला संघर्ष संयतपणे पकडण्याची त्याची क्षमता यातून कोणाही नाटककाराला वा दिग्दर्शकाला खूप शिकता येण्यासारखे आहे हे स्पष्टच आहे. परंतु भारतीय लवचिक शैलीचे प्रतिरूप म्हणून आपण जर फक्त ब्रेख्तच्याच नाट्यप्रयोगांचे अनुकरण केले तर मात्र आधीच वाजवीपेक्षा अधिक कथानकप्रधान असलेली मराठी रंगभूमी आपल्या वर्तुळाबाहेर कधी पडणार नाही. एक काळ असा होता की, ब्रेख्तच्या रंगमंचाच्या लोकप्रियतेची लाट इंग्लंड–अमेरिकेमध्ये उसळली. अनेक दिवस ब्रेख्तची नाटके रंगमंच व्यापून राहिली. त्यामुळ नामवंत समीक्षकांना व नाटककारांना ब्रेख्तच्या नाटकांचा पुनर्विचार करावा लागला आहे.

यापासून आपण काही शिकायला हरकत नाही.

'अजब न्याय वर्तुळाचा' हे मराठी रूपांतर चि. त्र्यं. खानोलकर यांचे आहे. खानोलकर सध्या 'दशावतारी' नाटकावर संशोधन करीत आहेत. ब्रेख्तच्या नाटकातील काव्यात्मकता लक्षात घेता, दुसऱ्या कोणा अनुवादकाला भाषांतर करणे अवघड गेले असते. परंतु स्वत: कवी (आरती प्रभू) आणि गीतकार असलेल्या खानोलकरांना हा अनुवाद करताना समानधर्मा भेटल्याचा आनंद झाला असेल. व्यंकटेश माडगूळकरांच्या 'देवाजी'त आणि खानोलकरांच्या 'अजब न्याय वर्तुळाचा'त हेच अंतर पडले आहे. खानोलकरांनी हुंसाच्या – आपल्या नायिकेच्या विविध चित्तवृत्तींचे दर्शन आपल्या संवेदनाक्षम पदांनी सहजपणे घडविले आहे. ब्रेख्तची बहुतेक नाटके दिर्घ असतात – त्याचे रूपांतर करताना संपादनाचे कार्यही महत्त्वाचे

असते. खानोलकरांनी व दिग्दर्शक द्वयांनी हे संपादन अत्यंत कौशल्याने केले आहे. मूळ नाटक दोन वस्त्यातील पाणीतंटयातून सुरू होते – खानोलकरांचे नाटकही कोकणातल्या एका गावातील पाणीतंटयातून सुरू होते. दशावतारी नाटकरूप निवडल्यामुळे खानोलकरांनी कोकणची निवड केली आहे. मूळ नाटकाच्या गाभ्याशी असणारा सामान्य माणसाच्या भुकेचा अनुभव कोकणच्या दारिद्र्याच्या संदर्भात सहज व्यक्त होऊ शकला असता. परंतु खानोलकरी लेखनात वा बेनेविट्झ-मेहता यांच्या दिग्दर्शनाने तो भाग फारच गौण मानला आहे. पूर्वी मुंबईत आलेल्या दिल्लीकरांच्या 'चॉक सर्कल' (वेनर-अल्काझी)च्या प्रयोगात नाटय-प्रयोगाच्या प्रारंभीच हा भाग फार ठामपणे प्रस्थापित केला गेला होता. एकाच मुलावर हक्क सांगणाऱ्या दोन स्त्रियांची ही कथा राजकीय क्रांतीच्या पार्श्वभूमीवर सांगितलेली ही (मूळ चिनी) लोककथा उत्तरार्धात 'अझदत' मराठी रूपांतरातील अजबदासाच्या न्यायदानाचा फार्स उभा करते. मराठी तमाशातील सामाजिक उपहास आणि ब्रेख्तच्या नाटकातील या न्यायाधीशाची संसृतिटीका यामध्ये खरं म्हणजे थोडे अंतर आहे. पण एकदा मराठी लोकनाटयाचे रूप पत्करल्यानंतर आणि सुहास भालेकरांनी अजबदास उभा करायचा हे ठरल्यानंतर 'अजब न्याय'मधील सामाजिक उपरोध-उपहास सोंगाड्या वळणावर जाणे अपरिहार्य होते.

ब्रेख्तचे नाटक असे म्हटले की त्यात समूहाचा वापर अटळपणे आलाच. 'अजब न्याय वर्तुळाचा' या प्रयोगाचा नटसंच खूप मोठा आहे. विजयाबाई आणि अल्काझीशिष्य माधव खाडिलकर यांनी या समूहाच्या विरचना फार कसोशीने बसवूनही त्यातील लवचिकता आणि सहजता जपली आहे. अर्थात या प्रकारचे विजयाबाईंचे कौशल्य त्यांनी त्यांच्या विद्यार्थीदशेत बसविलेल्या नाटकांपासून आपण पहात आहोत. त्यामुळे याच नाटकात त्याविषयी नव्याने आश्चर्यचकित कसे होणार ? या मोठ्या नटसमूहातही भक्ती बर्वे (हंसा), माधव खाडिलकर (नायक व इतर भूमिका) सुहास भालेकर (अजबदास) यांना विशेष वाव होता. सुहास भालेकर नाटकात सहसा दिसत नसले तरी तमाशातील नट म्हणून आपल्याला परिचित आहेत. आणि या नाटकातील त्यांची भूमिका ही तमाशाशैलीतीलच असल्यामुळे त्यांनी विलक्षण विश्वासाने केली आहे. माझे स्मरण मला दगा देत नसेल तर आज व्यावसायिक रंगमंचावर असणाऱ्या शशिकांत निकते यांनी अल्काझींच्या प्रयोगात हीच भूमिका त्यातील गंभीर बाजूसह फार मार्मिकतेने उभी केली होती. भक्ती बर्वे यांच्याभोवतीच सारे नाटयवर्तुळ फिरते त्यामुळे त्यांच्या अभिनय-कौशल्याला येथे भरपूर वाव होता. हंसाच्या भूमिकेत भक्ती बर्वे एकतर फार नागर वाटत होत्या, एरवी प्रेक्षकांच्या कानाला त्रास होईतो अनुनासिक

उच्चार करणाऱ्या भक्ती वर्वे कोकणी दशावतारी पद्धतीच्या नाटकातील (मासा पकडण्याचा उल्लेख जमेस धरून...) या भूमिकेत स्वच्छ ब्राह्मणी शव्दोच्चार करीत होत्या. हंसाच्या जीवनातील विविध प्रसंगातून तिच्या वयानुरूप येणारा अवखळपणा, अचानक आलेल्या प्रेमानुभवाने बावरून जाणे, विरहकल्पनेने विद्ध होणे, रक्ताचे नाते नसलेल्या मुलाशी मायेचे नाते निर्माण होणे या व अशा अनेक छटा भक्ती बर्वे यांनी अभिनयातून व्यक्त केल्या. स्वतःला मुक्तपणे नाट्यप्रयोगात झोकून देण्याची (शेवटच्या समूह नृत्यातही) त्यांची वृत्तीही दिसत होती. पण या नटीचा अभिनय पहात असता मनात मुख्य प्रश्न असा उभा झाला की हा ब्रेख्तला अभिप्रेत असलेला अभिनय आहे का? की ही भावनेला–प्रसंगी जी विवशता ब्रेख्तला टाळायची आहे तिला आवाहन करणारी अभिनयशैली आहे? हा प्रश्न विचारीत असता मला पूर्ण जाणीव आहे की एक नामवंत जर्मन दिग्दर्शक आणि दोन जर्मनीला जाऊन आलेले दिग्दर्शक अशा तीन जाणकारांच्या नजरेखाली हा अभिनय केला जात आहे. तरीसुद्धा ब्रेख्तने स्वतः केलेले लेखन व ब्रेख्तच्या रंगमंचावरील पुस्तके ब्रेख्तच्या नाटकातील अभिनयशैलीविषयी काही वेगळे सांगतात – हा काय प्रकार आहे? असो. कुसूम नाईक, वाळ कर्वे इ. नटनटींनी लहानसहान भूमिकाही त्यातल्या व्यंगरेखांसह सादर केल्या.

विजयाबाईंनी गतवर्षी सादर केलेल्या देवाजीचे सांगितिक स्वरूप फारच तुटपुंजे होते. या 'अजब न्याय वर्तुळाचा' ला भास्कर चंदावरकरांसारखा पारंपरिक संगीतरचना नाट्यकारणी लावणारा संगीत दिग्दर्शक लाभला आणि त्यामुळे वेगवेगळे 'मूड' पकडणारं, नाटकातल्या पदसंचलनाशी एकरूप होणारं संगीत या नाट्यप्रयोगाला


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही वरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

मिळाले. खानोलकरांची अनेक पदे अतिशय हृद्य आहेत. काही ठिकाणी मात्र नाट्यप्रयोगातील पदांच्या मानाने ती फार अलंकारिक झाल्यामुळे शब्द प्रेक्षकांपर्यंत पोचत नाहीत. परंतु 'थांबलीस का हो बयो थांबलीस का हो' 'भाऊ माझा भेटेल भेटेल' इत्यादी अनेक रचना मराठी लोकगीताचे संचित वापरून पुढे जाणाऱ्या आहेत. किंबहुना हे नाटक पहात असताना खानोलकरांनी गीतनाट्याचा प्रकार हाताळून पहावा असे वाटू लागले. या गीतगायनाला अरविंद चाफळकरांच्या आवाजासारखा लख्ख आवाज आणि नाट्यप्रयोगातील संगीताच्या स्थानाची समज असणारा दिग्दर्शक लाभल्यामुळे संगीत नाट्योपकारक झाले आहे. भक्ती बर्वे यांचा आवाज मात्र रंगमंचीय गायनास अनुकूल नाही त्यामुळे त्याचे पद प्रेक्षकांपर्यंत पोचलेच नाही.

अल्काझी-वेनर प्रयोगात वास्तवदर्शी नेपथ्य वापरले होते. या प्रयोगात तमाशाशैली पत्करल्यानंतर नेपथ्याचा प्रश्नच येत नव्हता. एकूण संपूर्ण प्रयोगाचा विचार करता 'अजवन्याय वर्तुळाचा' हा नाट्यप्रयोग उत्तम झाला. परंतु तरी या सर्व खटाटोपाचे प्रयोजन काय? असा दुष्ट विचार व्यक्तिशः माझ्याच नाही तर अनेकांच्या मनात आला. कारण एकतर युरोपातल्या नाट्यशैलीचा अभ्यास करावयाचा झाल्यास ब्रेख्तची शैली ही एकमेव नाही. प्रतिकृतीवादी, आभासावर आधारीत मनोरंजनप्रधान प्रस्थापित रंगमंचाविरुद्ध बंड आरत्रां-पिरांदेल्लोपासून आयेनेस्को जेनेपर्यंत अनेक नाटककार-दिग्दर्शकांनी केलेले आहे. केवळ ब्रेख्तने नव्हे. अनेकदा ब्रेख्त हा साम्यवादी नाटककार असल्यामुळे तो तेवढा बंडखोर असा आभास निर्माण करण्यात येतो. दिल्लीच्या राष्ट्रीय नाट्यशाळेने ब्रेख्तच करायचा, संघानेही ब्रेख्तच नव्हे तेच नाटक करावयाचे हा फारच भाबडा एकमार्गीपणा झाला. कालपरवा ग्रोटोव्हस्कीचा सहाय्यक, (पोलिश) मराद-सादेच्या यशाचा वाटेकरी मुंबईत येऊन गेला त्याची कुणालाही दखल नाही. शेवटी फक्त सचिनशंकरचा एक प्रयोग पाहून तो मुंबईतून गेला असे ऐकतो. दुसरा एखादा जर्मन दिग्दर्शक अनेकदा येतो, त्याच्या सहाय्यामुळे प्रयोगात फारसा फरक पडलेला दिसत नाही. असो. परंतु मुंबई मराठी साहित्य संघाने रांजणकरांच्या 'नकटी'वर पैसे वाया घालविण्यापेक्षा असे सत्कारणी लावावेत हे चांगलेच आहे.

—पुष्पा भावे

## कलोपासकाच्या एकांकिका

# मी तुमचं भूत शेख महंमद

महाराष्ट्रीय कलोपासकांच्या 'प्रयोग' उपक्रमात ऑक्टोबर महिन्यात रत्नाकर मतकरी यांची 'मी तुमचं

भूत ' आणि आणि नोव्हेंबर महिन्यात प्रा. वि. ज. गोडबोले यांची 'शेख महंमद' ह्या एकांकिका सादर झाल्या.

दोन्ही एकांकिकांचे लेखन सुमार आहे. एकांकिकेतील मूळ कल्पना दर्शनी बऱ्यापैकी वाटली तरी तिला नाटयरूप लाभलेले नाही. विशेषत: विनोद निर्मितीचा प्रयत्न केविलवाणा आहे. एखाद्या प्रसंगातून किंवा व्यक्तीच्या स्वभावातून विनोदनिर्मिती साधून, नाटयपरिणाम विकसित करणे ही नाटककारला आव्हानाची गोष्ट असते. ते आव्हान न पेलल्यामुळे किंवा डावलल्यामुळे फक्त शाब्दिक विनोदाचा आश्रय घेतला जातो आणि तोही क्षणजीवी असला तर नाटय परिणाम गमावून बसतो. ह्या एकांकिकांबाबत नेमके तेच झाले.

कमकुवत लेखन असलेल्या एकांकिकांना जर अधिक कलात्मक जाणिवेचा नटसंघ लाभला तर प्रयोग परिणाम वाढण्याची शक्यता काही प्रमाणात असते. कारण अभिनयाच्या बळावर आणि प्रयोग तंत्राधारे लेखनातील उणिवांवर थोडीफार मात करता येते. पण तसेही येथे घडले नाही. अपवाद फक्त 'शेख महंमद'मधील अनिल गोगटे यांचा होता. या कलाकाराला अभिनयाची जाण निश्चितच चांगली आहे, हे त्याने मागे झालेल्या 'अनाथ' मध्येही सिद्ध केले होते. गोगटे यांच्या मुक्त आणि सहज अभिनय पद्धतीमुळेच ती एकांकिका पाहणे सह्य झाले.

'मी तुमचं भूत'चे दिग्दर्शन शरश्चंद्र कलावंत यांनी केले होते. तर 'शेख महंमद'चे दिग्दर्शक होते शरद चितळे. दोन्ही दिग्दर्शक आणि एकांकिकेतील कलावंत हौशी आणि नवखे असल्याने प्रयोगही हौशीच झाले. त्यातल्या त्यात शरद चितळे यांचा दिग्दर्शनाचा प्रयत्न उजवा वाटला. एकांकिकेसाठी त्यांनी पार्श्वसंगीताचा केलेला वापर लक्षवेधी होता.

'प्रयोग' उपक्रमात संस्थेतील नवनवीन कलाकारांना आणि दिग्दर्शकांना वाव देण्याची कल्पना स्तुत्य आहे. पण कोणतीही संधी दिल्यावर तिच्या परिणामाचा विचार गंभीरपणाने होणे आवश्यक आहे. कारण या दोन एकांकिकांनी जर मागच्या एकांकिकांचे यश पुसून टाकण्यास मदत होणार असेल तर या संधीचा फेरविचार महत्त्वाचा आहे. केवळ (संस्थेतील) कोणालाही संधी द्यायची एवढाच मर्यादित विचार असला तर वाद करण्याचे कारण नाही. हे आवर्जून लिहिण्याचे कारण म्हणजे 'प्रयोग' या उपक्रमाला एक विशिष्ट दर्जा प्राप्त होऊ पाहतो आहे. संस्थेच्या या उपक्रमाला हौशी नाटयसंस्थांच्या कार्यामध्ये एक वेगळे महत्त्व येऊ पाहत आहे. ते टिकवून धरणे आणि विकसित करणे अगत्याचे आहे. हा विचार झाला नाही तर ठरल्याप्रमाणे महिन्याला एकांकिका 'साजरी' करणे एवढेच शिल्लक राहील. त्यामुळे घटकाभराची करमणूक करून घेण्यासाठी आलेल्या प्रेक्षक सुखावेलही! पण त्याहीपेक्षा (संस्थेकडून) अधिक काही अपेक्षित करणाऱ्या आमच्यासारख्या नाटयप्रेमींची निराशा होईल! कदाचित राज्यस्पर्धेच्या नाटकाच्या तयारीत संस्थेतील मातबर मंडळी गुंतल्याने असे घडले असेल!

—वि. भा. देशपांडे

उदंड उत्साह . . .

गलथान, बेजबाबदार व्यवस्था . . .

अनपेक्षित निकाल . . .

# नाट्यस्पर्धा : मुक्काम पुणे

शरद गोखले

स्पर्धेतील नाटक आणि उदंड गर्दी असा योग संपूर्ण मालिकेमध्ये केवळ तीन-चार वेळा येतो. कोणती नाटके बघायची आणि कोणती टाळायची याचे अडाखे स्पर्धेच्या मराईत प्रेक्षकांनी मांडून ठेवलेले असतात. चालू वर्षीच्या स्पर्धेमध्ये ज्या संस्थांना प्रेक्षकांच्या उदार आश्रयाचे भाग्य लाभले अशा संस्थांमध्ये जुन्या मंडळींची एक नवीन संस्थाही होती. संस्थेचे नाव – थिएटर अॅकॅडमी, नाटक 'मिकी आणि मेमसाहेब' आणि लेखक दिग्दर्शक – सतीश आळेकर.

घाशीराम कोतवाल या गेल्या वर्षीच्या नाटकाने प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन या मातब्बर संस्थेमध्ये प्रचंड वादळ उठवले. संस्थेची मोडतोड झाली. घाशीराम ग्रुप – थिएटर अॅकॅडमीचा वेगळा झेंडा घेऊन बाहेर पडला आणि मिकी आणि मेमसाहेब हे नाटक स्वतंत्रपणे स्पर्धेमध्ये उतरवून चालू वर्षीच्या स्पर्धेतील मानाचेपान पटकावले. काही तांत्रीक कारणासाठी शिशुरंजनचे बॅनर घेऊन ही मंडळी स्पर्धेमध्ये उतरली.

मिकी आणि मेमसाहेब ही माझ्या माहितीप्रमाणे आळेकर यांची पहिली संपूर्ण नाट्यकृती. पुरुषोत्तम करंडक स्पर्धा गाजवणाऱ्या 'एक झुलता पूल' या एकांकिने आळेकर यांच्या लेखणीचे वेगळेपण व टवटवीतपणा स्पष्ट केला होता. 'सामना' या दुसऱ्या एकांकीने त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा वाढवल्या आणि मिकी आणि मेमसाहेब या आपल्या पहिल्या पूर्ण नाटयकृतीने आळेकरांनी लेखनाच्या दृष्टीने या माध्यमाचा अगदी वेगळ्या पद्धतीने वापर करून त्यात यश संपादन केले.

मिकीच्या लेखनापुरते बोलायचे झाल्यास विसंगतीतून सुसंगती हे आळेकर यांच्या लेखणीचे एक प्रमुख वैशिष्टच असल्याचे नमूद करावे लागेल. विषय निश्चित करून त्या भोवती आळेकरांनी आपले नाटक उभे केले आहे. अलगपणे विचार करता येण्यासारखा भाग त्यांच्या लेखनामध्ये नाही. व्यावसाईक रंगभूमीसाठी मात्तबर मंडळी आज ज्या पद्धतीचे लेखन करतात, त्या पेक्षा अगदी वेगळी – व्यक्तीगत स्वरूपाची कोणतेही अडाखे नसलेली, अलंकारीक भाषेचा वापर टाळणारी–अशी लेखनपद्धती आळेकर यांनी अनुसरली आहे. या पद्धतीच्या लिखाणाला आपला सर्वसाधारण प्रेक्षक अपरिचीत आहे. त्यामुळे मिकीचा शेवट तसा समारोपात्मक असूनही अगदी नियमीत नाटके बघणारीही कित्येक मंडळी तिसऱ्या अंकाच्या घंटेची वाट पहाताना दिसली. म्हणूनच लिखाणातील वेगळेपणासंबंधी जरा विस्ताराने लिहिले.

मिकी आणि मेमसाहेब या नाटकामधील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे एका प्राध्यापकाची. व्यवसायाने यशस्वी प्राध्यापक असला तरी –त्याची व्यक्तिगत आयुष्यामध्ये कोंडी झाली आहे. 'Sex-Game' मध्ये गुरफटलेला हा प्राध्यापक मोरपंखी पिसाचा शिडकावा करणाऱ्या शयन सुखामध्ये अडकून पडलेला आहे. आणि दुर्दैवाचा भाग म्हणजे आपली कोंडी झाल्याची त्याला जाणीव आहे. पण त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग त्याला सापडत नाही. सापडला तरी त्याला तो नको आहे. वैक्तिक वासनेभोवती सर्व आयुष्य केंद्रीत झाल्याने त्याच्या आयुष्यातील अन्य सर्व भाग अर्थहीन बनला आहे. अगतिकता आहे पण ती हवी हवीशी वाटणारी आहे. यातून बाहेर कसे पडणार. या प्राध्यापक महाशयाला अखेरीस एक मार्ग सापडलेला आहे. वापरतील ते हा मार्ग ? आहे त्यांच्यामध्ये तेवढी हिंमत ?–याचा निर्णय प्राध्यापक घेतील. लेखक आणि प्रेक्षक या दोघांनाही त्यात गोडी नाही.

मिकी आणि मेमसाहेब–वरील जास्तीत जास्त सुस्पष्ट भाष्य वर नोंदवले आहे आणि हे भाष्य वाचूनही नाटक न पाहिलेला वाचक, किंवा नाटक पाहिलेला प्रेक्षक गोंधळलेला राहणार आहे. किंबहुना तो तसा थोडासा गोंधळलेलाच रहावा अशी नाटककाराचीही अपेक्षा असावी. मिकीच्या प्रयोगाची मदार प्रामुख्याने मोहन अगाशे यांच्यावर होती. त्यांच्या काहीशा चिरक्या आवाजाचा या भूमिकेला विलक्षण उपयोग झाला. जुईली देऊस्कर यांची मेमसाहेब–नाटकाचा आशय सुस्पष्ट करणारी होती. मोहन गोखले यांचा गुळवणी–काही वेळा नाट्यसूत्राच्या दृष्टीने विसंगत वाटला. या प्रकृतीच्या नाटचप्रयोगामध्ये कलाकार केवळ उत्तम अभिनेता असून भागत नाही. नाटकातील आपल्या कामगिरीची त्याला पुरेपूर जाणीव असणे आवश्यक असते. सुदैवाने मिकीचे सर्व कलावंत या दृष्टीने पूर्ण तयारीने रंगभूमीवर

उतरल्याचे जाणवत होते.लेखक आळेकर यांनीच प्रयोगाचे दिग्दर्शन केले असल्याने प्रयोगाला वेगळीच धार आली होती. स्वतःला अभिप्रेत असलेल्या पद्धतीने नाटक रंगभूमीवर आणणे त्यांना शक्य झाले. निर्मितीची बाजू जवळजवळ संपूर्णपणे निर्दोष होती. प्रत्येक तंत्रज्ञाने आपला वाटा अचूक उचलला होता. मेमसाहेबांची नाटचवस्तूतील उंची अचूकपणे पोचवण्याची कामगिरी प्लॅट-फॉर्मने चांगल्या प्रकारे साधली. एका अगदी वेगळचा विषयावरील, वेगळ्या पद्धतीने लिहिलेली नाटचकृती सादर करून थिएटर अॅकॅडमीच्या कलाकारांनी स्पर्धेतील मानाचे पान पटकावले आहे.

रंगभूमीवरील स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी धडपडणारी आणखी एक नवीन संस्था म्हणजे ड्रॉपर्स. ही संस्थाही स्पर्धेमध्ये प्रथमच उतरली आणि आपल्या वैशिष्टचपूर्ण नाटच-कृतीच्या नीटस प्रयोगाने स्वतःचा ठसा उमटवून गेली. या सस्थेने 'एक असतो राजा' हे दिलीप जगताप यांचे नाटक स्पर्धेमध्ये उतरले. स्थलकालाच्या मर्यादा स्पष्ट न करता वर्गविग्रहाभोवती गुंफलेल्या या नाटचकृतीमध्येही नाटक-काराच्या मांडणीचे कौशल्य होते. स्थितीप्रिय शासन कोणत्याही मार्गाने उखडणे महाकर्मकठीण. हा विचार या नाटकाने धारदार वाटावा इतक्या तीव्रतेने मांडला. सोम्याची मुख्य भूमिका आनंद लागू यांनी अकारण अक्रस्ताळे-पणाने करून स्वतःच्या मर्यादा स्पष्ट केल्या. सोम्याचे काम खूप मोठे, म्हणूनच लागू लक्षात राहण्याइतके वेगळे पडले. त्यांचे एकसुरी बोलणे विलक्षण त्रासदायक ठरले. तरुणीची भूमिका करणाऱ्या कु. वैजयंती ओक त्यांची दृश्ये त्या मानाने सरस उतरली. कलाकारांपैकी राजाची भूमिका करणारे दिलीप वि. कोल्हटकर अन्य सर्व कला-कारांपेक्षा उजवे वाटले. बाकीची सर्व मंडळी अनुभवी नसली तरी उत्साही होती. आणि जवळजवळ एकाच ताकदीची होती. त्यामुळे एक संघ म्हणून या नटसंघाचा चांगला प्रभाव पडला.

नाटकाचे नेपथ्य दाद द्यावी इतक्या उत्तम प्रकारे विषय परिपोषक होते. सेक्शनल लाइटिंगचा वापर ही आता नित्याची बाब झाली आहे. स्पर्धेमध्येही तो अनेक मंडळींनी केला. पण या पद्धतीची गरज आणि फायदा उठव-ण्याची कुवत, ज्या थोडचा संघानी दाखवली त्यामध्ये ड्रॉपर्स आघाडीवर होते. एक नवीन संस्था आकाराला येत असल्याची जाणीव ड्रॉपर्सनें निश्चितपणे करून दिली. ¤

## कुणीकडून कुणीकडे

चालू वर्षीच्या स्पर्धेपूर्वी ज्या नाट-काची जबरदस्त हवा होती असे नाटक म्हणजे महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेने सादर केलेले 'कुणीकडून कुणी-कडे' हे विद्याधर पुंडलीक यांचे नाटक. विद्यार्थी जगतातील अशांतता हा नाट-काचा विषय. पुंडलीकासारखा मातब्बर

लेखक, आणि सादर करणार कलोपासक. स्वाभाविकपणे अपेक्षा खूप उंचावल्या होत्या. प्रयोगही अपेक्षापूर्ण करणारा झाला नाही तरी चांगला झाला.

नाटकाचा विषय ॲकॅडमीक स्वरूपाचा. आणि विषयाचे हेच स्वरूप पुंडलीक यांनी आपल्या नाट्यकृतीमध्ये प्रकर्षाने मांडले. नाट्य कमी, लेखामध्ये शोभावी अशी चर्चा जास्त. बहुधा शेवट निश्चित करून लिखाण केले गेले असावे. बौद्धीक प्रश्नाचा शारिरीक झटापटीमध्ये शेवट योजून त्या दिशेने लेखन प्रवास झाल्याचे जाणवते. दोन अंकी नाटकामध्ये घटनास्थळे तीन व प्रसंग चार. त्यापैकी परीक्षा गृहामध्ये प्रवेश करण्यापूर्वीचा भाग आणि कॉमनरूम मधील—अगदीच सपक असा चर्चात्मक भाग नाटकाच्या प्रयोग यशास मारक ठरले. जे दोन भाग उचलले गेले त्यापैकी एक परीक्षा हॉल—मधील प्रारंभीचा भाग आणि अखेरचा प्रा. राव हॉलमधून गेल्यानंतरचा भाग. ढीगभर कलाकारांकडून—राजा नातू यांनी उत्तमप्रकारे कामे करवून घेतली. वैयक्तिक वाव अर्थात दोन तीन कलाकारांनाच होता. त्यापैकी सर्वात निष्प्रभ ठरले माधव वझे ! आणि व्यक्तिरेखेला अभिप्रेत असलेल्या व्यक्तित्त्वाची उणीव असूनही सर्वात प्रभावी ठरले वासुदेव पाळंदे. अखेरचे दृश्य तर त्यांनी जवळ जवळ एकट्याच्या ताकदीने यशस्वी केले. त्यांचा हा ध्येयवादी शिक्षक दीर्घकाळ लक्षात राहील. कॉमनरूममधील प्रवेश जास्तीत जास्त जिवंत वाटावा, या साठी पुंडलीक यांनी पात्रांच्या विविधतेचा, लेखनासाठी भरपूर उपयोग करून घेतला आहे. तथापी कॉमनरूम कोसळली. आणि नाटकाचे स्पर्धेतील यशही तिथेच फसले असे मला वाटते. अर्थात या फसलेल्या भागाची जवाबदारी कोणा एकावर टाकणे कठीण आहे. तथापी हा भाग फसल्याने नाटक एकदम खाली उतरले हे मात्र खरे. प्रारंभीचा, परीक्षा हॉल पूर्वीचा भाग जास्त सुसंबद्ध असणे आवश्यक होते. त्यातही पुढील परिणामाचे दृष्टीने विद्यार्थी नाईक आणि त्याच्या आईमधील सुखद संवादाचे दृश्य चांगले वाटले. पस्तिशीच्या घरातील वझे महाविद्यालयीन विद्यार्थी म्हणून का वावरले हे समजू शकत नाही. अनेक उमदी पोरसवदा मंडळी असताना – एक महत्त्वपूर्ण – स्वगत माधव वझे यांच्या वाटचाला आले आणि त्याचा अपेक्षीत तो परिणाम न झाल्याने वझें अयशस्वी ठरले. निवड करणारे राजा नातू हेही या अपयशाचे वाटेकरी ठरतात. परीक्षा हॉलमधील प्रारंभीची व अखेरची दृश्ये समर्थपणे सादर करून त्यांनी आपल्या दिग्दर्शन कौशल्याची चुणूक जरूर जाणवून दिली. जिव्हाळ्याच्या विषयावरील वेगळा प्रयोग म्हणून कुणीकडून कुणीकडे जरूर लक्षात राहील. ◻

## प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन

पी. डी. ए.–या प्रा. भालबा केळकर यांच्या नेतृत्त्वाखाली उभ्या असलेल्या संस्थेने–प्रा. ल. ग. देव यांनी लिहिलेले

'विझले सारे नंदादीप' हे नाटक सादर केले. एका क्रांतीकारकाच्या वाट्याला आलेली दारुण शोकान्तिका हा या नाटकाचा विषय. प्रचिलीत राजकीय परिस्थितीचा जास्तीत जास्त लाभ उठवून या शोकान्तिकेला 'धार' देण्याचा प्रयत्न करण्यातही काही फारसे गैर नव्हते. परंतु या मर्यादा ओलांडून नाटक दुसऱ्या अंकामध्ये अगदी भलतीकडेच भरकटल्याने विषयाचा पोच एकदम सुटल्यासारखे झाले आहे. नाटकाचा पहिला अंक पुष्कळ व्यवस्थित वाटला. फ्लॅश बॅक, सेक्शनल लाईटिंग,— आदि तांत्रीक बाबींचा वापर कल्पकतेने केल्याचे जाणवले. दुसऱ्या अंकामध्ये क्रांतीकारक विश्वनाथ नाट्यलेखनाकडे वळतो. इतकेच नव्हे तर आपल्या एका जुन्या स्नेह्याच्या मदतीने एका नाट्यसंस्थेमध्ये दाखल होतो. या नाट्यसंस्थेच्या कचेरीतील विश्वनाथ, वांगे नावाचा एक नव नाटककार, आणि संस्थाचालक देसाई यांच्यामधील प्रवेश अक्षरश: ठिगळासारखा जोडल्याने रंगणाऱ्या प्रयोगाची मौज नाहीशी झाली. क्रांतीकारक विश्वनाथाचा मुलगा दिलीप आणि त्याची प्रेयसी रीना. यांच्यामधील हॉटेलमधील दृश्य असेच अकारण आणल्यासारखे वाटते.

केली कामगिरी कागदावर नोंदवून क्रांतिकारकांना सरकारी सहाय्यासाठी अर्ज करावा लागावा, आणि सार्वजनिक जीवनामध्ये वावरताना कोणतेही विधी निषेध न बाळगता ज्यांनी लौकीक यश मिळवले अशा मंडळींमार्फत हा अर्ज पुढे जावा; हा वास्तवाशी इमान राखणारा हृद्य भाग हा या नाटकातील सर्वात यशस्वी भाग. समाजाकडून क्रांतिकारकांच्या वाट्याला आलेली उपेक्षा, हा मनाला पटणारा भाग आणि क्रांतिकारकाच्या वाट्याला आलेले कौटुंबिक अपयश हा नाट्य फुलवणारा भाग, यांची सांगड लेखकाने पारंपरिक पद्धतीने घालून त्याला साहेबाकडून आलेल्या रकमेच्या आमिशाची खमग फोडणी देऊन, क्रांतिकारकाच्या आत्महत्त्येने उदात्त वाटावा, असा या नाट्यकृतीचा शेवट केला आहे.

पी. डी. ए. तील अनेक मातब्बर मंडळी संस्था सोडून गेल्याने निर्माण झालेली पोकळी नाटकाच्या निवडीपासून ते वावरणाऱ्या कलाकारांपर्यंत सर्वत्र जाणवत होती. सुदैवाने नाटक तसे एक खांबी होते आणि क्रांतिकारक विश्वनाथच्या भूमिकेचा हा एक खांब, दिग्दर्शक श्रीराम खरे या जुन्या जाणत्या कलाकाराने समर्थपणे पेलला होता. संयमीत अभिनयाचे सुंदर दर्शन घडवणारी रामभाऊंची ही भूमिका दीर्घकाळ लक्षात राहील. विश्वनाथच्या आयुष्या बरोबर जिची फरफट झाली आहे अशी शांताची— विश्वनाथच्या पत्नीची भूमिका मीनाक्षी कुलकर्णी यांनी विलक्षण तन्मयतेने साकार केली. संवाद घोळण्याच्या विशिष्ट एकसूत्री पद्धतीतून त्यांनी या व्यक्तिरेखेची अगतिकता चांगली दाखवली. दाद द्यावी असा आणखी एक जुना कलावंत म्हणजे केशव धुळे. वारा येईल तशी पाठ

फिरविणाऱ्या 'चालू' पुढाऱ्याची भूमिका केशवरावांनी मार्मीकपणे साकार केली. त्यांच्या यशस्वी भूमिकेमूळे विश्वनाथची उंची आणखी वाढली हा त्यांचा नाटकाच्या यशातील वाटा. कडक शिस्तीमध्ये तालमी घेऊन बाकीचे कलाकार उभे होते. त्यांनी आपापल्या परीने प्रयत्न जरूर केले. वयाला साजेल अशी सुरेख भूमिका भालबा केळकर यांच्या वाट्याला आली. या भूमिकेचे त्यांनी सोने केले. ◻

## अखेरचा प्रयोग

अविश्रांत परिश्रम, अव्यभिचारी निष्ठा, उत्तम सहकारी, आणि असे असूनही लौकीक यश न मिळालेला एका हौशी संस्थेचा सूत्रधार, जीवनामध्ये अयशस्वी ठरलेल्या आणि अखेरीस आत्महत्त्या केलेल्या गुरुनाथ नावाच्या एका मातब्बर चित्रपट दिग्दर्शकाच्या आयुष्यावर आधारलेले नाटक रंगभूमीवर आणतो. पहिल्या प्रयोगाला उभा राहातानाच, नाटकाच्या अखेरीस आपण खरोखरच आत्महत्त्या करायची असे त्याने ठरवलेले असते. तथापी नाट्यप्रयोन चालू असताना, जीवनामध्ये जगण्यासारखे काही आहे, असे वाटावे अशा घटना घडतात. तथापी आता उशीर झालेला असतो. आपल्या अयशस्वी आयुष्याचा शेवट करण्यावाचून चंद्रशेखरला गत्यंतर नसते. आणि नाटकाच्या अखेरीस नाटकातील नायका प्रमाणे चंद्रशेखर खरोखरच आत्महत्त्या करतो.

ग. वा. बेहरे यांच्या लेखणीतून उतरलेला हा अखेरचा प्रयोग महा. बँक स्पोर्टस क्लबच्या नाट्यशाखेने सादर केला.

'घे भरारी पाखरा' या सी. रामचंद्र यांनी गायलेल्या गीताच्या पार्श्वभूमीवर नाटकाचा अत्यंत संथलयीमध्ये प्रारंभ झाला. कलाकारांपैकी श्रीनिवास भणगे ठीक वाटले. तथापी फाजील नखरा, आणि कृत्रिमतेची झालर, यामुळे त्यांचा पडावा तितका प्रभाव पडू शकला नाही. ज्योती मोघे यांनी सुरंगाचे काम मन लावून केले. एकंदर संच तयारी करून आलेला जिद्दी संघ वाटण्या ऐवजी हौशी संघच वाटला. नाटकाचा एकत्रित परिणाम फारसा प्रभावी ठरू शकला नाही.

केवळ चार पात्रांभोती केंद्रीत झालेली एक नीटस नाट्यकृती 'रातराणी' महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने सादर केली. पद्माकर गोवईकर यांचे हे नाटक व्यवसायिक रंगभूमीवर पूर्वीच येऊन गेले आहे. विजया मेहता, आणि दत्ता भट यांच्या सारख्या मातब्बर कलावंतांनी या नाटकामध्ये प्रमुख भूमिका केल्या होत्या. सर्वसाधारणपणे अशा नाटकाची निवड धोक्याची ठरते. एक तर कळत न कळत प्रयोगाची तुलना केली जाते, किंवा कलाकार नामवंत व्यवसायिक कलाकाराची नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. रातराणीच्या प्रयोगाच्या वेळी तुलना जरूर झाली. तथापी कला-

कारांनी नक्कल करण्याचा मोह टाळला. ज्योती चांदेकर (हंसा चौबळ) व मंगेश तेंडूलकर (प्राध्यापक पाळंदे) यांनीच हे नाटक सावरले. भालचंद्र पानसे यांचा राजशेखर फारच उथळ होता. या भूमिकेला न्याय्य आकार देण्यात पानसे चांगलेच कमी पडले. सुरेश कोकीळ यांनी उभ्या केलेल्या विनयला अकारण खलनायकी ढंग दिल्यारखे वाटले. सिनेमा पासून लोक-नाट्यापर्यंत सर्वत्र वावरणाऱ्या ज्योती-बाई हौशी कलाकार कशा म्हणायच्या हा एक प्रश्नच आहे. निर्मितीची बाजू व्यवस्थित संभाळली होती. रातराणीला या स्पर्धेत दुसरे बक्षीस मिळाले. यात 'मेरीट' पेक्षा पानसे यांच्या नशिबाचा भाग जास्त आहे असे म्हणावे लागेल. एक होता राजा; कुणीकडून कुणीकडे, आणि विझले सारे नंदादीप या तीन सरस प्रयोगांना डावलून हे नाटक अंतिम फेरीसाठी जाते याचे आश्चर्य वाटते. ◻

## रंगश्रीचे शाकुंतल

एका विफल झालेल्या प्रेमाची कहाणी शाम फडके यांनी 'असेही एक शाकुंतल' या नाटकामध्ये पॅरलल डेव्हलपमेंटचे तंत्र वापरून सादर केली आहे. शाकुंतल शिकवणारा राजा नावाचा एक शिक्षक, आणि त्याची नंदा नावाची एक विद्यार्थिनी यांच्या विफल प्रेमाची कहाणी सांगताना, अतूट प्रेमाच्या अमर कथा चवीने वाचणारा समाज, निस्सीम प्रीतीची कशी क्रूरपणे वाट लावतो, यातील विसंगतीचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न शाम फडके यांनी केला आहे. हाती असलेल्या विषयाचा जीव वास्तविक एकांकीचा. तथापी ताणून त्याचे नाटक केले आहे. नाटक एकजीवी न वाटता तुटक दृश्यातून आकार घेणारी संथ लयीतील कलाकृती वाटते. प्रयोगाच्या बाबतीत मात्र सर्व मंडळी तयारीने उभी असल्याचे जाणवत होते. दिग्दर्शक श्रीपाद गोखले यांनी प्रयोगावर भरपूर मेहनत घेतल्याने प्रसंग चांगले उभे राहत होते. तथापी नाटकाची लय अशी काही कंटाळवाणी लागली की प्रेक्षक कित्येक वेळा विलक्षण 'बोअर' झाले. सूत्रधार म्हणून श्रीकांत कुमकर यांनी काम केले. जास्त समंजस कलाकाराची या भूमिकेसाठी गरज होती. विजय कुलकर्णी या समंजस कलाकाराने 'राजा'ची मुख्य भूमिका जास्तीत जास्त सहजतेने करण्याचा प्रयत्न केला. तथापी या भूमिकेला पूर्ण न्याय द्यायला कुलकर्णी कमी पडले. रघुनाथ मोघे यांचा सोनवणे दिसला चांगला, पण काम बेताचेच. सुलभा गोखले नंदाचे अवघड काम ठीक करून गेली. तथापी एक छोटासा सीन वाट्याला येऊनही राजाच्या आईची भूमिका करणाऱ्या सौ. स्मिता ओक, अन्य सर्व कलाकारांपेक्षा वरचढ ठरल्या. रघुनाथ थत्ते (प्रकाश) रवि ओक (ध्वनी) व व्यवस्था मनोरंजन या स्पर्धा ठेकेदार मंडळींनी आपली काम-गिरी व्यवस्थित बजावली.

—

## अनिल बर्वे यांचे नाटक

अनिल बर्वे यांच्या वाट चुकलेल्या कोलंबसासंबंधी खूप अपेक्षा होत्या. तथापी राजकीय विचारसरणीच्या गडद सावलीमध्ये लिहिल्या गेलेल्या त्यांच्या या कलाकृतीने खूप निराशा केली. त्यांच्या नाटकापेक्षा नाटकावर भाष्य करणारे आणि नाट्यगृहामध्ये वाटण्यात आलेले त्यांचे प्रदीर्घ निवेदन जास्त परिणामकारक वाटले. त्यांच्या विषयाशी जवळीक असलेले व ड्रॉपर्सने सादर केलेले–'एक असतो राजा.' ही कलाकृती जास्त सरस वाटली. प्रदीर्घ लेखाला शोभणारा एखादा बळकट विषय नाटकाद्वारा बळेच मांडण्याचा प्रयत्न केल्यास त्या नाटकाचे कसे खोबरे होते, याचे उदाहरण म्हणून बर्वे यांच्या या कलाकृतीचा उल्लेख करावा लागेल. नाटकाची प्रकृती आणि प्रचाराची धार पाहता सोविएट लँड नेहरू पारितोषिक बर्वे यांना या कलाकृतीबद्दल मिळाले याचे आश्चर्य वाटत नाही.

बर्वे यांच्या सुदैवाने या नाटकाचा प्रयोग करणारे कलाकार, तुलनेने पुष्कळच सरस असल्याने हे नाटक बघण्याइतपत प्रयोगशील झाले. मात्र मला अजूनही असे वाटते की श्रवणीय बाजू जास्त बळकट असलेली ही कलाकृती आकाशवाणीवर जास्त सुसह्य होईल.

कॉस्मॉपॉलीटन कल्चरल सोसायटीच्या कलाकारांपैकी श्रीहर्ष जोगळेकर (सैनिक) सर्वात सरस वाटले. कमलाकर कर्वे विलक्षण नाटकी पद्धतीने बोलले, वावरले. केवळ पाच कलाकार असलेल्या या कलाकृतीतील अन्य कलाकार वैयक्तिक वैशिष्टय दाखवण्याच्या भरीस न पडता कामे करून गेले.

स्पर्धेतील नाट्यप्रयोग म्हणून ज्यांची दखल घ्यावी अशा नाटकांपैकी अखेरचे नाटक म्हणजे कोलंबस वाट चुकला.– वर उल्लेखलेल्या नाटकाखेरीज ज्यांच्या हौशीचे आणि उत्साहाचे कौतुक करावे असे नाट्यप्रयोग म्हणून कला मंदीरचे घेतले शिंगावर, नाट्यवृंदचे चक्रव्युह, हौशी कलाकार संघाचे अखेर नोकर मिळाले. संपदा थिएटर्सचे 'दत्तक नाटक' – सरला डाव उरला घाव, व विठोबा देवस्थान (भोरवाड) या नटसंघाचे 'अस्तंगत भानू' – या नाट्य प्रयोगांचा उल्लेख करावा लागेल. मूळ स्पर्धेपासून अलग विचार करावा अशी ही पाच नाटके स्पर्धेमध्ये सादर करण्यात आली. आपल्याला स्पर्धेमध्ये यश मिळेल, अशी या पैकी एकाही नटसंघाची अपेक्षा नव्हती, तयारी नव्हती, आणि कुवतही नव्हती. आणि तरीही ही नाटके स्पर्धेमध्ये झाली. दरवर्षी होतात. आणि प्रेक्षकांची एका वेगळ्या अर्थाने करमणूक करतात! प्रेक्षकही या नाट्य प्रयोगांकडे फारसे गंभीरपणे पहात नाहीत. चांगल्या गोष्टींना दाद द्यायची, वाईट असेल ते सोडून द्यायचे– असा स्नेहसंमेलनातील नाटकांचा जो अलिखित नियम असतो तो नियम या गटातील नाटकांना लावला जातो. मात्र ही नाटकेही स्पर्धेमध्ये पाहिजेतच.

अशांच्या अस्तित्त्वाशिवाय स्पर्धांना पूर्णत्त्व येणार नाही. शिवाय चार-दोन वर्षे – या हौशी गटामध्ये वावरल्यावर याच संस्था हळूच – स्पर्धेच्या दृष्टीने ज्यांचा विचार करावा, अशा गटामध्ये येऊन बसतात. आणि त्यांच्या जागी एखादी नवीन संस्था येऊन उभी राहते. अथवा दोन चार वर्षांनी हौस पूर्ण झाल्यावर खुशीने निवृत्ती स्वीकारतात. (उदा. मराठी ग्रंथसंग्रहालय नटसंघ).

या वर्षी या गटामध्ये जी नाटके झाली त्यामध्ये 'अस्तगंत' भानू या ग्रामीण भागातून आलेल्या नाटकामध्ये – डॉ. अनंत मेहंदळे (नानाफडणीस) दत्तोपंत भाटे (विसुभाऊ) व आबासाहेब ओक (रावबाजी) हे तीन कलाकार आपली वैयक्तीक छाप उमटवून गेले. या वर्षी या मंडळींनी नाना फडणवीस यांच्या अखेरच्या दिवसांवर आधारित 'अस्तंगत भानू' ही ऐतिहासीक नाटचकृती सादर केली. कलाकारांची कुवत पाहता कमी पात्रे असलेले सामाजिक नाटक त्यांना ज्यास्त पेलले असते असे वाटते. 'अखेर नोकर मिळाले–' या सौ. शोभना ओगले यांच्या नाटकामध्ये – एक बायकांच्या जिव्हाळयाचा एक विषय भरपूर विस्तार करून मांडला होता. या नाटकाचा विषयही वास्तविक पाहता एकांकिकेचा, पण ताणून त्याचे पूर्ण नाटक केले होते. सौ. सेना चौहान यांनी काही वैयक्तिक प्रेमापोटी नाटकाचे दिग्दर्शन स्वीकारले असावे. अन्यथा त्यांना या नाटकाचे आकर्षण वाटावे असे या नाटकामध्ये काहीही नाही. काही घरेलू दृष्यातील वास्तवता वाखाणण्याइतकी चांगली होती. सौ. प्रभा सराफ यांची वारणा ताई–त्यांच्या 'Non Professional' टच मुळे, भलतीच धारदार, व एखाद्या घरातील वारणाताई इतकी सफाईदार वाटली. नाटचवृंदने सादर केलेल्या चक्रव्यूह या नाटकातील अकूनची भूमिका करणारे लिमये – त्यांच्या आवाजातील नैसर्गिक दोषाचे वैगुण्य वगळता ठीक वाटले. रंगा संत यांचे मार्गदर्शन लाभलेला हा प्रयोग पुष्कळच ठाकठीक वाटला.

खूप दिवसापूर्वी नाटचसंपदा या मातब्बर संस्थेने 'विकत घेतला न्याय' हे मामा तोरडमल यांचे नाटक रंगभूमीवर आणले होते. त्याच विषयावरील सरला डाव उरला घाव हे नाटक संपदा थिएटर्स मार्फत सादर करण्यात आले. सेक्रेटरी पाठक ही भूमिका करणाऱ्या निळकंठ दामले यांनी पूर्ण निराशा केली. नयनतारा–ही नाटकातील मध्यवर्ती व्यक्तिरेखा सौ. माधवी काळे यांच्यापेक्षा जास्त समर्थ कलाकाराची या भूमिकेसाठी गरज होती. अर्थात एकंदर नटसंच यथातथाच असल्याने, माधवी काळे नयनतारा म्हणून खपून गेल्या इतकेच.

कलामंदिरने सादर केलेला 'घेतलं शिंगावर' या नाटकाचा प्रयोग बऱ्यापैकी रंगला, त्याचे श्रेय कलाकारांपेक्षा लेखक मनोहर काटदरे यांच्याकडे जास्त जाते. वेताच्या वकुवाचे कलावंत असल्याने व्यावसाईक रंगभूमीवर येऊन गेलेले हे हलके फुलके नाटक निवड-

ण्याचा निर्णय योग्य वाटला. ज्या संस्थेच्या नाट्यगृहामध्ये या स्पर्धा झाल्या ती भरत नाट्य मंदिर ही एक जुनी संस्था. निर्मितीची भरपूर ताकद असलेल्या या संस्थेला स्पर्धेची नस अजून सापडू नये हे दुर्दैव म्हणावे लागेल. या वर्षीचे महत् भिकार नाटक सादर करून भरत नाट्यमंदिर या संस्थेने स्पर्धांचे सूप वाजवले. संस्थेचे एक पदाधिकारी माधव गाडगीळ यांच्या 'सावल्या' या नाटकामध्ये प्रेक्षागृहामध्ये वाटलेल्या छापील पत्रका खेरीज सांगण्यासारखे काहीही नव्हते. असले हे दिशाहीन नाटक–अनंतराव ओक यांनी दिग्दर्शनासाठी का स्वीकारावे हे समजू शकत नाही. एकाद्या वर्षी ओक स्पर्धेमध्ये नसते तर काही बिघडले नसते. पण नाही, ओक आले आणि असले फालतू नाटक घेऊन आले. स्पर्धेसाठी नाटकाची निवड ही अगदी प्राथमिक बाब. भरत नाट्य मंदिरासारख्या जुन्या संस्थेने या बाबतीत इतका गलथानपणा दाखवावा याचे आश्चर्य वाटते. या नाटकातील कलाकारांसंबंधी तरी काय लिहावे,–सर्वच कलाकार गोंधळलेले. कितीही स्टाईलड् असले तरी त्यातल्या त्यात विनायक गोडसे बरे वाटले. अभिनय कसा नसावा, याचे एक प्रात्यक्षिक–माधव वझे यांनी कोणीकडून कोणीकडे मध्ये दाखवले. त्याच पद्धतीचा दुसरा सुंदर पाठ–सौ. विदुला इनामदार यांनी या नाटकातील सुमित्रांच्या भूमिकेद्वारा गिरवून दाखवला. इतकी उथळ व हास्यास्पद अविष्कार पद्धती–बाबा ओक यांचे मार्गदर्शन असूनही पहावयास मिळाली, याचे सखेद आश्चर्य वाटते.

**गलथानपणा...बेजबाबदारपणा....**

हजारो रुपये खर्च करून घेण्यात येत असलेल्या या स्पर्धांच्या प्रसिद्धीसाठी स्पर्धांचे संयोजन करणाऱ्या समाजकल्याण खात्याने विशेष दक्षता घेणे अत्यंत अवश्य होते. विभागीय समाजकल्याण अधिकारी प्रसादराव गायकवाड यांच्याकडे स्पर्धेची सूत्रे होती. प्रत्यक्ष व्यवस्थापन–सुर्वे नावाचे कोणी अधिकारी करीत होते. वृत्तपत्रीय प्रतिनिधींना समाजकल्याण खात्यामार्फत जी वागणूक देण्यात आली ती चीड आणणारी होती. नाटक-सिनेमासाठी दैनिकांकडे वेगळी मंडळी असतात, नियमित वार्ताहाराचे हे काम नसते याची जाणीवही या खात्याला नसावी याचे आश्चर्य वाटते. अडीचशे सीटस्‌ची खिरापत वाटणाऱ्या समाजकल्याण खात्याने–स्पर्धांवर लिहिणाऱ्या वृत्तपत्र प्रतिनिधीसाठी केवळ पाच जागा–त्याही ५ व्या रांगेतील ठेवल्या होत्या. या 'पाच' पासेस बाबतही कोणतेही धोरण नव्हते. केसरी, तरुण भारत, सकाळ–यांच्याकडे वार्ताहारांसाठी पासेस पाठवले गेले. कोणत्याही साप्ताहिकाला प्रारंभी पास नव्हता. बरे, फक्त दैनिकांना पासेस दिले असे म्हणावे तर प्रभात या दैनिकाला 'पास' न मिळाल्याची तक्रार या दैनिकाचे संपादकांनी खाजगी चर्चेमध्ये बोलून दाखवली.

'रसरंग' हे नाट्य चित्रपट विष-

यक साप्ताहिक. या साप्ताहिकाचे प्रतिनिधी अभय हवालदार यांना पहिल्या दिवशी मेहरबानी केल्याप्रमाणे शेवटून दुसऱ्या रांगेमध्ये जागा दिली. स्वतःची ओळख त्यांनी रसरंगचा प्रतिनिधी अशी करून दिल्यावर, असं रसरंग हे काय आहे बुवा ! अशी पृच्छा करण्यात आली. सा. मनोहरचे प्रतिनिधी सुधीर गाडगीळ यांना-नाट्यगृहापासून दोन मैलावर असलेल्या समाज कल्याण खात्याच्या कचेरीतून रोजच्या रोज प्रवेशपत्र घेऊन जाण्यास सांगण्यात आले ! माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी स्पर्धेतील महत्त्वाची नाटके तिकीट काढून पाहिली.

सा. माणूसने स्पर्धांचे सविस्तर परीक्षण प्रतिवर्षी प्रसिद्ध केले आहे. गेल्या वर्षी तर जवळ जवळ स्पर्धा विशेष अंक प्रसिद्ध केला. तथापी पासेस बाबतचा एकंदर गोंधळ पाहून मी सरळ प्रसादराव गायकवाडांना भेटलो. पास देता येणार नाही असे लिहून द्या व चाळीस रुपयांचे एक सीझन तिकीट द्या अशी मी मागणी केली. अरे यांना वरती कोठे तरी बसवता आले तर पहा–असा आदेश त्यांनी सुर्वे यांना दिला. हा प्रकार विलक्षण चीड आणणारा होता. नाट्य समीक्षणाचे दृष्टीने योग्य जागा मिळाली तरच मी पास घेईन,– नाही तर मला सरळ तिकीट द्या असे मी सांगितल्यावर मला ' जी ' रांगेतील एक जागा मिळाली. समाज कल्याण खात्याकडून पासेसची खिरापत झाल्याने तिकीट काढून काही महत्त्वपूर्ण नाटकांना येऊ इच्छिणाऱ्या अनेक रसिकांची निराशा झाली. तर खात्याची मानकरी मंडळी इतकी उदासिन की बाहेर हाऊस फुल्लचा बोर्ड आणि तरीही तिकीटासाठी गर्दी तर आत–अनेक खुर्च्या रिकाम्या अशी स्थिती आढळून आली. स्पर्धांच्या बाबतीत उदासीन असणाऱ्या मंडळींना पास देण्यातील प्रयोजन समजू शकत नाही. तसे खात्यामार्फत पन्नास पेक्षा जास्त जागा मोफत देणे नाट्य रसिकांवर अन्याय करणारे आहे.

एकंदर व्यवस्थापनातही भरपूर गलथानपणा होता. मला दिलेल्या जागेवर बहुतेक वेळा कोणीतरी दुसरे बसलेले असे. मग दुसरीकडे माझी सोय लावण्यात येई. त्या जागेवर अन्य गृहस्थ आल्यास तिसरीकडे–असा हा खो-खो चा खेळ अनेक जागेबाबत चालू होता. स्पर्धकांना प्रसिद्धी कोणामार्फत दिली याचा आढावा घेऊन–पुढील वर्षी तरी वृत्तपत्राबाबत योग्य ती दक्षता घेतली जाईल अशी अपेक्षा बाळगणे गैर ठरणार नाही. तसेच श्री. सुर्वे यांच्यासारखा बेजबाबदार अधिकारी व्यवस्थापनासाठी न नेमता परिस्थिती कौशल्याने हाताळणाऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक व्हावी. श्री. सुर्वे अपरिहार्य असतील, तर–त्यांनी अधिक जबाबदारीने काम करावे. एक गोष्ट मात्र खरी की या वर्षी व्यवस्थापनाकडून जितका कटू अनुभव वृत्तपत्रीय प्रतिनिधींना आला तितका कटू अनुभव यापूर्वी कधीही आला नव्हता. योग्य सुधारणा होण्याच्या हेतूने–हा संपूर्ण खेदजनक किस्सा खुलासेवार नोंदवून स्पर्धा प्रकरणाचा समारोप करतो.

● ● ●

## बँक लुटालुट...सहकार स्टाईल
पृष्ठ ५ वरून

आणि पुढले सर्व हप्तेही बाकी राहण्याचीच शक्यता जास्त.

का येवढे या संस्थेबद्दल प्रेम? भानगडबाज संस्था म्हणून. कामगारांना पिळणारी संस्था म्हणून? की पैशाच्या कारभारात अनेक गफले असल्याने ही ही आत्मीयता? एकदा कधीतरी यशवंतराव चव्हाणांच्या सभेला मोठे स्टेज, मंडप वगैरे घालून दिले की सर्व पापे माफ होतात काय?

जिल्ह्यातल्या ४ हाऊसिंग सोसायट्यांनाही ३ लाखावर बेकायदेशीर कर्ज देण्यात आहे.

आणि हे प्रकार नजर चुकीने झालेत काय? लातूर तालुक्यात आणि उस्मानाबाद जिल्ह्यात नेतृत्वांची झूल पांघरून गप्पा ठोकत फिरणाऱ्या ह्या लोकांनी हे सर्व हेतुपुरःसर केले आहे असे म्हणायला जागा आहे. अटींचे उल्लंघन कर्मचाऱ्यांच्या नजरचुकीने झालेले नाही. तर बऱ्याच वेळा वरिष्ठांच्या लिखित किंवा अलिखित आज्ञेवरूनच हे प्रकार झाले आहेत. कारण ज्यांच्या बाबतीत हे उल्लघन झाले त्यात बँकेचे संचालक व त्यांच्या संबंधित मडळींचा अंतर्भाव असण्याचा स्पष्ट आरोप ऑडीटरने केला आहे.

बँकेला आवश्यक छपाई, वाहनांचे स्पेअर पार्टस् विकत घेणे या बाबतीत बँकेच्या वर्तनात संशयाला खूप जागा आहे. संचालक मंडळानेच निर्णय घेतला की सहकारी मुद्रणालयालाच काम मिळावे. पण तरीही प्रत्यक्षात खाजगी मुद्रकांनाच काम मिळाले. हीच कथा सुट्या भागांची. केशवराव सोनवण्यांच्या भावाच्या वर्कशॉपचा उपयोग करून घेण्यात आला. टेंडर्स मागवणे वगैरे भानगडच नाही.

ही एक गंमत पहा : १४–२–७२ ला उस्मानाबादला झालेल्या आमसभेकरिता ८५० ते ९०० लोकांकरिता खाद्यपदार्थ घेतल्याचे ९८० चे बिल करण्यात आले. वस्तुस्थिती अशी आहे की प्रत्यक्षात १३७ लोक निमंत्रित व त्यांच्याबरोबरचे इतर मिळून ३०० ते ४०० लोक हजर होते.

मग ह्या वरच्या पैशाचे काय?

अशा अनेक गंमती जमती बँकेच्या कारभारात पहायला मिळतील.

आर्थिक टंचाई होती. जुने डुप्लिकेटर मशीन दुरुस्तकरून वापरता येण्यासारखे असतानाही ९७७४–८० रु. खर्च करून नवीन मशीन घेण्यात आले. ही सर्व सामान्य शेतकऱ्यांच्या पैशाबद्दलची आस्था!

जीप गाड्या ही तर या पुढाऱ्यांची आवडती वस्तू. खाजगी कामासाठी वापर करणे ही नेहमीची सवय. ऑडीटरने अशाप्रकारे गाडी वापरण्याबद्दल नाडे – विजयसिंह चालुक्य आदींकडून ९४०० रुपये वसूल करावेत असे म्हटले आहे.

स्वतःची गाडी नसतानाही बँकेच्या मिटिंगसाठी गाडीभत्ता उचलण्यात

आला आहे. बँकेच्या वाहनाने प्रवास करून एस. टी. ने किंवा स्वतःच्या वाहनाने प्रवास केल्याचे दाखवून पैसा उचलण्यात आला आहे. वरील सर्व मंडळींची नावे वरील यादीत आहेत. कित्येक वेळा इतर कामे करण्यासाठी पेट्रोल वापरण्यात आले आणि बँकेच्या गाडीचा क्रमांक टाकून पैसे घेण्यात आले आहेत.

एक मासलेवाईक उदाहरण पहा. बँकेचे एक संचालक विजयसिंह चालुक्य यांनी २३।६।७१. ला बँकेच्या कामाकरिता गाडी क्र. ७८८ ने औरंगाबाद प्रवास केल्याचे दाखवून ४३/२२ रु. उचलले. पण प्रत्यक्षात या क्रमांकाची गाडी त्या दिवशी लातूरलाच होती.

अनेक गैरप्रकारांनी घेतलेल्या पैशाची हजारो रुपयांची वसूली संचालकांकडून करण्याचा आदेश ऑडीटरने दिला आहे.

काही कारणे दाखवून चक्क दोन सहलीच काढल्या. बँकेच्या संचालकांनी आणि ३२०० रु. खर्च केले या सहलीवर.

बँकेच्या फोनचाही गैरवापर करण्यात आला.

जीप्सची लॉग बुक्स व्यवस्थित ठेवण्यात आलेली नाहीत. व्हाऊचर्समध्ये अनेक गोंधळ आहेत, इन्स्पेक्टर्सनी शाखांची तपासणी नीटपणे केलेली नाही. बुडणार हे माहीत असताना कर्जवाटप करण्यात आले आहे, एक ना अनेक अनंत भानगडी.

एका कारभाराची माहिती देऊन हे अध्ययन संपवावे म्हणतो.

बँकेने देना बँक सोलापूर व नवभारत ट्रान्स्पोर्ट एजन्सी सोलापूर यांना अनुक्रमे ४·५० लाख ६·५० लाख रुपयांची नं २ ची गॅरंटी, जिल्हा सहकारी मोटार वाहतूक सघ मुरुड यांना १५ वैयक्तिक सभासदांच्या वतीने प्रत्येकी रुपये ४००० च्या घेतलेल्या फार्गो ट्रकच्या कर्जाच्या परतफडी करता दिली होती. ही कर्जाची परत फेड दर सहा महिन्याला १ लाख रुपये प्रमाणे डिसेंबर १९६९ पासून ३१–५–७२ पर्यंत ६ हप्त्यात करावयाची होती. वहातूक संघाचे हे सभासद किंवा त्यांच्या वतीने वहातूक संघ ही परतफेड मुदतीत करू शकले नाहीत आणि या रकमेचा फार मोठा हिस्सा अजून बाकी आहे. (लेखा परीक्षेच्या काळी) यामुळे नवभारत ट्रान्स्पोर्ट

---


# पुरंदरच्या बुरुजावरून

ब. मो. पुरंदरे

मूल्य : चार रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

एजन्सी सोलापूर यांनी वहातूक संघ आणि बँक दोघांवरही केस केलेली आहे. बँकेला यामुळे नुकसान सहन करावे लागणार आहे. १५ सभासदांची गॅरंटी (२१ पैकी) बँकेने दिली आहे आणि ६ सभासदांची गॅरंटी ठराव न घेता स्वतःच्या सहीने बँकेचे अध्यक्ष श्री. नाडे यांनी दिली आहे.

हा सर्व व्यवहार सहकार तत्त्वाच्या विरोधी आहे. त्यात धोका आहे हे माहीत असूनही हितसंबंध गुंतले असल्यानेच असा निर्णय घेतला गेल्याचे लेखा परीक्षकाने स्पष्टपणे नमूद केले आहे. मुरुडमध्ये नाडे यांचे हितसंबंध आहेत. ते मुरुडचे सर्वेसर्वा लीडर आहेत. त्यामुळे हे सर्व आश्चर्यकारक वाटण्याचे कारण नाही.

अशी ही सहकारी बँक सामान्य शेतकऱ्यासाठी आहे असे म्हटले जाते पण कारभार हा असा थेट धर्मा तेजा स्टाईलवरचा. जय सहकार.

● ● ●

---

## सोलकढी

पृष्ठ ७ वरून

म्हणजे कानडी माणसांनी मनन करायचे. पण कानडीअप्पांजवळ विवेक अंमळ कमीच. त्यांनी दरोबस्त जाळपोळीला आरंभ केला. बसवलिंगप्पांना राजीनामा द्यायला लावला. त्या जाळपोळीत झालेल्या राखेचा अंगारा कपाळी लेवून सध्या कानडी अस्मिता मिरवते आहे.

सीमाप्रश्नाची सोडवणूक महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोघांवरच असती तर सरळसरळ लढाईने ती सहज करून घेता आली असती. पण केंद्रसरकारची भानगड मध्ये आहे ना. आणि केंद्रसरकारलासुद्धा त्याची अशी एक नाकर्तेपणाची खास अस्मिता आहेच.

—अनंतराव

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

**Manoos / 444 / 73 / c**
Circulation Manager,
Manoos Weekly,
Poona 30.

**C. B. Kadapatti,**
News Paper and
Rubber Stamp Agent,
MAHALINGPUR ( Bijapur )
14 Dec. 1973

Sub. : **STOP THE SUPPLY**

The strike of the students in connection with the Karnatak-Maharastra border dispute has gone to the extreme and as a result My **Paper Stall has been burnt making heavy loss.** I lost paper bundles and account books etc.

In view of the above facts I request you to **Stop** the paper supply **immediately.**

I will be writing to you again.

Yours faithfully
**C. B. Kadapatti**
**( Signature )**